# शिवराज

मव्वद

कर्मवीर वि.रा. शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लजचे
शिवराज साहित्य-वाणिज्य व डी. एस. कदम
विज्ञान महाविद्यालय आणि संभाजीराव माने
कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज

Scanned with CamScanner

# यशवंत बझार

# श्री साने गुरुजी शिक्षण सेवकांची सहकारी पत संस्था मर्यादित, गडहिंग्लज संचलित

तालुका गडहिंग्लज जिल्हा कोल्हापूर

१) संस्थेची सभासद संख्या – १६०० २) येणे कर्ज रक्कम ९०-/- लाख

३) संस्थेची आजरा येथे दुसरी शाखा

४) मयत सभासदाचे वारसास आकस्मीक मृत्यूठेव योजनेतून रुपये ५००००/- विना परतीचे आर्थिक सहाय्य देणारी महाराष्ट्रातील एकमेव संस्था

५) सन ८८-८९ सालामध्ये पतसंस्थेला निव्वळ नफा रु. २४३०००– इतका झाला आहे.

६) संस्थेचे कार्यक्षेत्र कोल्हापूर जिल्हा

७) संस्थेचे सन ८७–८८ सालाचे अहवालास राष्ट्रीय सहकारिता तथा ग्रामीण प्रबंधन संस्था यांचेकडून पतसंस्था विभागातून राज्यपातळीवरील द्वितीय क्रमांकाने पारितोषिक व प्रशस्ती पत्रक मिळाले आहे.

८) संस्थेने माहे नोव्हेंबर ८८ पासून यशवंत बझारची सुरुवात केली या बझारमार्फत संस्थेच्या सभासदाना कापड, टी व्ही. संच धान्ये, कडधान्ये, शालेप्रयोगी साहित्य व माल उधारीने व हप्त्याने देण्याची सोय केली आहे

९) १ नोव्हेंबर ते ३० जून अखेर यशवंत बझारची १६/–लाख रू ची विक्री झाली आहे.

१०) यशवंत बझारकडे व्हीडीओकॉन, सलोरा, ओनिडा, वेल्टेक या नामवंत कंपनीचे कलर व ब्लॅक व्हाईट टी व्ही. व टेपरेकॉर्डर विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

विक्रीनंतर तत्पर सेवा

सर्व वस्तू, स्वच्छ वस्तू स्वस्त वस्तूसाठी यशवंत बझारला एक वेळ आवश्य भेट द्या

| प्रा. के. व्ही. कुराडे | श्री. एस. आर. पाटील | जी. अे. पाटील | एस. एस. पाटील |
|---|---|---|---|
| चेअरमन | व्हा. चेअरमन | सेक्रेटरी | व्यवस्थापक |
| जे. बी. वारदेस्कर | श्री. टी. अे. पाटील | बी. जी. काटे | श्री म. दुं. हिरेमठ |
| संचालक | संचालक | संचालक | संचालक |
| श्री. शि. रा. मगदुम | श्री अ. म. मोरे | श्री. गौ. या. मुल्ला | |
| संचालक | संचालक | संचालक | |

# शिवराज - ९०

## संपादक समिती

**अध्यक्ष :** मा. प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले

**प्रमुख संपादक :** प्रा. एम. आर. धनगर ※ **कार्यकारी संपादक :** प्रा. व्ही. एम. सुरंगे

**सदस्य :** प्रा. के. बी. केसरकर ※ प्रा. आर. बी. कांबळे ※ प्रा. ए. पी. गवळी
प्रा. ए. बी. कुंभार ※ प्रा. बी डी. मुरगी ※ प्रा. एम. बी. महाजन

**विद्यार्थी प्रतिनिधी :** श्री. दिलीप देसाई

**मुखपृष्ठ :** श्री. बी. जी. कुंभार ※ **छायाचित्रे :** श्री. मारुती चव्हाण
**मुद्रण :** पार्वती प्रिंटर्स, गडहिंग्लज.



Scanned with CamScanner

## – इमारत बांधकाम समिती –

| | | |
|---|---|---|
| मा. डी. एस. कदम | – | अध्यक्ष |
| मा. प्रि. डॉ. डी. व्ही. तोगले | – | सेक्रेटरी |
| मा. के. जी. पाटील | – | सदस्य |
| मा. शं ना. चव्हाण | – | सदस्य |
| मा. रामभाऊ चव्हाण | – | सदस्य |
| डे. इंजिनिअर बी. अॅन्ड सी. गड. | – | सदस्य |
| आर्किटेक बाबासाहेब पाटील | – | सदस्य |
| मा. बी. एस. मोहिते | – | सदस्य |

## – गव्हर्निंग कौन्सिल –

| | | |
|---|---|---|
| रा. शं. तथा बाळासाहेब माने | – | चेअरमन |
| मा. डी. एस. कदम | – | सदस्य |
| प्रा. भैरव कुंभार | – | सदस्य |
| मा. बाबा अडकूरकर | – | सदस्य |
| मा. धोंडिराम पताडे | – | सदस्य |
| अॅड. श्रीपतराव शिंदे | – | सदस्य |
| मा. के. जी. पाटील | – | सदस्य |
| मा. वाय. आर शिंदे | – | सदस्य |
| मा. मुकुंदराव आपटे | – | सदस्य |
| मा. शिवाजीराव सावंत भोसले | – | सदस्य |
| मा. बचाराम मोहिते | – | सदस्य |
| मा. नागापण्णा बटकडली | – | निमंत्रित |
| प्रा. एम. पी. पाटील | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| प्रा. एस. एस. नाळे | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| प्रा. जयंत सबनीस | – | प्रशासकीय प्रतिनिधी |

Scanned with CamScanner

# स्फूर्ती आणि प्रेरणा



## कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

Scanned with CamScanner

## संस्थापक अध्यक्ष



मा. खासदार बाळासाहेब माने

Scanned with CamScanner

उपाध्यक्ष



मा. डी. एस. कदम

Scanned with CamScanner

## प्राचार्य



मा. डॉ. डी. व्ही. तोगले

Scanned with CamScanner

# संपादकीय



'शिवराज ९०' हा वार्षिक अंक महाविद्यालयातील वार्षिक कार्यातलाच एक भाग अशा अंकात शैक्षणिक वर्षाचेच प्रतिबिंब सामावलेले असते आणि प्रतिबिंब हे प्रत्यक्षाहुन अधिक लोभस वाटते. अनेक तडजोडीना सामोरे जाऊन हा अंक विद्यार्थ्यांसमोर ठेवताना सर्वाच्याकडून स्वागत होईल अशी अपेक्षा बाळगतो.

'शिवराज' साठी साहित्य मागवण्याबद्दलची नोटीस लावली आणि उदंड प्रतिसाद मिळाला. विशेष करुन कवितेला बऱ्याच विद्यार्थ्यांच्या साहित्यातून त्यांची धडपड व कला-गुण दिसून आले. त्यांचे बोल 'बोबडे' असले तरी त्यातही सौंदर्य निश्चितच होते. बरेचसे लेख, कथा कविता इत्यादी साहित्य अंकात घेण्याजोगे असून सुद्धा पानांच्या मर्यादेमुळे घेता आले नाही याची रुखरुख वाटते. अशाच विद्यार्थी लेखकांपैकी आमचा एक विद्यार्थी लेखक अशोक पाटील यांच्या शिवराज ८९ मधील २० th Century Romeo and Juliet " या कथेस पारितोषिक मिळाले याचा उल्लेख केल्यावाचून रहावत नाही.

यां अंकातील वेगवेगळया विभागाचे काम पाहाणारे प्राध्यापक व प्रा. एस्. डी. पाटील यांचे चांगले सहकार्य मिळाले. विशेष म्हणजे जाहिरात विभागाचे काम यु. आर. दिलीप देसाई, काशीनाथ कटाळे, के. व्ही. राव, सुरेश रेडेकर व दयानंद खोराटे यांनी सांभाळले. या अंकाच्या संपादन कार्यात प्राचार्य डॉ. डी. व्ही तोगले यांचे मार्गदर्शन आणि कार्यालयीन आधिक्षक जयंत सबनीस व त्यांचे सहकारी यांचे सहकार्य लाभले.

– प्रा. एम्. आर्. धनगर
– प्रा. व्ही. एम्. सुरंगे

Scanned with CamScanner

# मनोगत

प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले

महाविद्यालयाच्या वार्षिकासाठी मनोगत लिहित असताना माझ्या प्राचार्यपदाच्या कारकिर्दीचे अर्धे तप संपले हे प्रथम लक्षात येत आहे. हे वर्ष तसे महोत्सवाच्या दृष्टीने अतिशय तीव्रतेनें लक्षात राहणारे ठरले. भारताचे भाग्यविधाते पं. जवाहरलाल नेहरु यांच्या जन्मशताब्दीची समाप्ती व संस्थेच्या रौप्य–महोत्सवाचा सांगता समारंभ याच वर्षी झाला. कर्मवीर विठ्ठल रा. शिंदेंच्या आधीच्या व मागच्या शृंखलेतील म. फुले पुण्यतिथी शताब्धीचे व आंबेडकर जन्मशताब्दीचे हेच वर्ष या थोर विचारवंतांच्या विचारांचे योग्य संस्कार व सह्याद्रीच्या काळ्या कातळातील असलेला कणखरपणा आणि त्यांच्या बरोबरीनें उदंड आत्मविश्वास उराशी बाळगणारा एक नव समाज या महाविद्यालयानें या परिसरात निर्माण केला आहे ही अत्यंत अभिमानाने व्यक्त करण्यासारखी गोष्ट आहे.

काही नवे चेहरे व जुनें चेहरे यांच्या सोबतीनें जुनमध्ये महाविद्यालयाच्या नवीन वर्षाची सुरुवात नेहमीप्रमाणे झाली निवडणूका निर्वेधपणे पार पडल्या आणि कार्यक्रमाना गती प्राप्त झाली. निवडणुकीनंतर वर्गप्रतिनिधीच्या सत्कार समारंभाने सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात झाली आणि मग वर्षभर विविध व्याख्याने कथाकथन अशा रुपाने ही शृंखला अधिक फुलत राहिली. हुंडाबंदी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शन विभाग ह्या विविध विभागाचे कामकाज अपेक्षेप्रमाणे याही वर्षी परंपरेला साजेशा पद्धतीने चालू आहे.

पण ज्या काही गोष्टीचा उल्लेख खास वैशिष्टये म्हणून करता येईल त्यामध्ये झोनल स्पोर्टस हे हे महत्वाचे वैशिष्टच. वीस वर्षानंतर आम्हाला शिवाजी विद्यापीठाचे विभागीय सामने भरवण्याची संधी मिळाली व आम्ही ती व्यवस्थीतपणे पार पाडली

विभागीय स्पर्धा पार पडल्या आणि लोकसभेच्या नौबती झडल्या आणि पुन्हा एकदा आमच्या संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब माने लोकसभेवर निवडून आले या वर्षातील ही संस्थेच्या व आम्हा सर्वांच्या दृष्टीने आनंददायी घटना या आनंदातच स्नेहसंमेलनाचीही अधिक भर पडली कवीवर्य त्रि. दा. करंदीकर व सिनेकलावंत मा. राजशेखर या दोघांची वार्षिक स्नेहसंमेलनासाठी उपस्थिती हा एक आगळा वेगळा योग होता.

वर्षभराच्या कालावधीतील शैक्षणीक घडामोडींचा विचार करत असताना यशस्वी रीतीने सुरु झालेले संगणक केंद्र व व्यवस्थीत पार पडलेले "परिवार नियोजनाकडे पाहण्याचा ग्रामीण भागातील लोकांचा बदलता दृष्टीकोन" आणि धर्म, रुढी, परंपरा आणि स्त्रियांचा दर्जा" या दोन विषयावरील यु जी सी पुरस्कृत परिसंवाद यांचा उल्लेख करता येईल.

पूर्णत्वाकडे निघालेली आमच्या महाविद्यालयाची भव्य वास्तू त्यासाठी मा. मानेसाहेब व उपाध्यक्ष मा. डी. एस. कदम यांनी केलेले प्रयत्न यांचा उल्लेख हाही अत्यंत महत्वाचा. कारण संस्थेच्या विकासामध्ये गुणात्मक व संख्यात्मक अशा दोन्ही वाढी महत्वाच्या असतात.

याच प्रेरणेने काम करणारे माझे सहकारी व विद्यार्थी पाहिले की अभिमानाने ऊर भरून येतो व महाविद्यालयाची जनमानसातील प्रतिमा प्रतिपश्चंद्रलेखेव वर्धिष्णु होत राहणार यांची खात्री पटू लागते.



Scanned with CamScanner

# प्राध्यापक वर्ग १९८९-९०

## इंग्रजी विभाग

प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोंपले
,, के. बी. केसरकर
,, जी. बी. कुलकर्णी
,, एन. आर. सावंत
,, सौ. एम. ए. मुजुमदार
,, आर. बी. कांबळे
,, के. ए. सावेकर

## मराठी विभाग

प्रा. बी. बी. देशमुख
,, व्ही. एस. बन्ने
,, सुधीर जोशी
,, ए. बी. कुंभार
,, व्ही. एम. सुरंगे
,, ए. पी. गवळी

## हिंदी विभाग

प्रा. डॉ. एस. जी. गोकाककर
,, डॉ. के. आर. पाटील
,, एम. बी. महाजन

## अर्थशास्त्र विभाग

प्रा. ए. ए पवार
,, डी. आर. खटके
,, एन. बी. जाधव
,, सौ. एस. वाय. कोले
,, एस. एस. येळेकर

## समाजशास्त्र विभाग

प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड
,, के. व्ही. कुराडे
(दीर्घ मुदतीच्या रजेवर)
,, एम. आर. धनगर
,, जे. व्ही. कुराडे
,, एम. बी. पाटील

## राज्यशास्त्र विभाग

प्रा. पी. डी. सावंत
,, एस. बी. भोळे
,, सी. ई. धुमाळ

## मानसशास्त्र विभाग

प्रा. के. बी. सोरटे
,, ई. जी. कांबळे
,, एस. एस. क्षीरसागर

## शारीरिक शिक्षण विभाग

प्रा. ए. एस. नाळे
,, एस. एस. सावंत

## वाणिज्य विभाग

प्रा. सी. एस. गवसणे
,, एन. डी खिचडी
,, आर. बी. तेली
,, आर. एन. हारगुडे
,, एम. ए. बामणे
,, वाय. पी कोले
,, एस. बी. कडूकर

## रसायनशास्त्र विभाग

प्रा. टी. एन. पाटील
,, डॉ. पी. जी. मोरे
,, टी. एन. पवार
,, बी. जे. देसाई
,, एस. डी. पाटील
,, ए. एम. हसुरे
,, व्ही. बी. कुरळे

प्रा. पी. एम. भोईटे
,, एस. एच. रावण

## फिजिक्स डिपार्टमेंट

प्रा. एस. ए. जोडगुद्री
,, बी. डी. मुरगी
,, एम. पी. पाटील
,, बी. एम. कुलकर्णी
,, एस. एम. पाटील
,, बी. एस. पाटील
,, व्ही. आर. पाटील
,, बी. डी. पाटील

## संख्याशास्त्र विभाग

प्रा. डी. एम. म्हेतर
,, आर. के. देशपांडे

## गणित विभाग

प्रा. डी. जी. बाठारे
,, एन. एम. गरुड

## प्राणीशास्त्र विभाग

प्रा. सौ. यु. आर. कणसे
,, आर. एम. कणसे
,, कु. एस. पी. भोसले

## वनस्पतीशास्त्र विभाग

प्रा. डॉ. एस. वाय. कोतमिरे
,, डॉ. एस. के. नेर्ले
,, जे. व्ही. सरतापे

## जीवशास्त्र

प्रा. पी. टी. कट्टी



Scanned with CamScanner

# प्रशासकीय कर्मचारी – १९८९–९०

### कार्यालयीन अधिक्षक

श्री. जे. ए. सबनीस

### ग्रंथपाल

श्री. टी. ए. पाटील

### वरिष्ठ लिपिक व अकौन्टंट

श्री. बी. एस. मोहिते

### वरिष्ठ लिपिक

श्री. व्ही. एम. गवळी
सौ. पी. वी. सावंत

### लिपिक

श्री. बी. डी. रेगडे
,, वाय. डी. पाटील
,, बी एस. सावंत
,, डी. एम. मोरे
,, ए. जी. कदम

### प्रयोगशाळा मदतनीस

श्री. डी. जी रेंदाळे
श्री. आर. बी. आयरनाईक
श्री. पी. जी. पवार

### शिपाई

श्री. बी. आय. रामपुरे
श्री. एस. एस. गवळी
श्री. पी. के. जाधव
श्री. सी. एल. गोरुले
श्री. पी. व्ही, नडगेरी

### लायब्ररी अटेंडंट

श्री. एम. एच. देसाई
,, एन. एस. पवार
,, एस. बी. मुसळे
,, एम. बी. माने
,, एन. एस. कांबळे
,, व्ही. आर. टेंबरे

### लॅब अटेंडंट

श्री. बी. डी. मोरे
,, एम. जी. खोत
,, एस. डी. पाटील
,, टी. आर. देवडकर
,, व्ही. व्ही. कोंडूसकर
,, एस. बी. खोत
,, टी. बी. कांबळे
,, आर. के. वडर
,, एस. एस. हजारे
,, एस. एम. मोरबाळे
,, के. आर. कांबळे
,, एल. एस. नाईक


**Form No. IV (Rule No. 3)**

| | | |
|---|---|---|
| Place of Publication | — | Shivraj College, Gadhinglaj |
| Periodicity of Publication | — | Annual |
| Printer's Name | — | M/s. Parvati Printers, Gadhinglaj |
| Editor's Name | — | Prof. M. R. Dhangar<br>Prof. V. M. Surange |
| Nationality | — | Indian |
| Address | — | Shivraj College, Gadhinglaj |

I, Principal Dr. D. V. Togale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dr. D. V, Togale

22-4-1990

Signature




Scanned with CamScanner

## प्राध्यापक वर्ग



## प्रशासकीय विभाग



## भित्तीपत्रक उद्‌घाटन



Scanned with CamScanner

# वैशिष्ठ्यपूर्ण तीन चर्चासत्रे



हिंदीच्या त्रिदिवसीय संगोष्ठीत बोलताना डॉ प्रभाकर माचवे



समाजशास्त्र विभागातर्फे त्रिदिवसीय राज्यस्तरावरील परिषदेत अध्यक्षीय भाषण करताना मा खासदार बाळासाहेब माने व शेजारी डॉ. के. श्रीनिवासन




धर्म, रुढी, परंपरा आणि भारतीय स्त्रीचे जीवन या चर्चा सत्राचा उदघाटन समारंभात विद्याबाळ बोलताना उद्घाटक-देवदत्त दाभोळकर

Scanned with CamScanner

# सांस्कृतिक विभागाचे कार्यक्रम



विद्यार्थी प्रतिनिधींचा सत्कार,
प्रमूख पाहूणे
मा. प्रा. एम. डी. नलावडे



स्वामी विवेकानंद या विषयावर
बोलताना प्रा. भालेराव



श्री. एम. के. गोंधळी यांचे
कथाकथन

Scanned with CamScanner

# राष्ट्रीय सेवा योजना मधील विद्यार्थी

प्राचार्य व सरपंच यांचे समवेत औरनाळच्या शिबिरातील एन्. एस्. एस् चे छात्र



– एन्. एस्. एस्. ग्रुप लिडर –



श्री. काकडे पी.
बी. ए–२



श्री. पाटील एस. बी.
बी ए–२



शरीर सौष्ठव स्पर्धेतील विजेते

Scanned with CamScanner

# विविध विद्या शाखा



बी. ए-३
मराठी विभाग



बी. ए-३
हिन्दी विभाग



बी. ए-३
इंग्रजी विभाग

Scanned with CamScanner

# विविध विद्या शाखा



बी. एस्सी–३
फिजिक्स व केमेस्ट्री विभाग



एम. ए.
इंग्रजी विभाग



प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड
१९८९ मध्ये एम्. फिल्



प्रा. रवींद्र तेली
१९९० मध्ये एम्. फिल्.



प्रा. एस. एस. सावंत
एम्. पी. एड्. प्रथम वर्गात उत्तीर्ण

Scanned with CamScanner

# विविध विद्या शाखा



बी. ए–३ व एम. ए,
समाज शास्त्र विभाग



बी. ए–३
अर्थ शास्त्र विभाग



बी. ए–३
राज्य शास्त्र विभाग

Scanned with CamScanner

# विविध विद्या शाखा



बी. कॉम–३
अकौन्टन्सी विभाग



बी कॉम–३
सहकार विभाग



बी. कॉम–३
औद्योगिक व्यवस्थापन विभाग

Scanned with CamScanner



# मराठी विभाग

विभागीय संपादक : प्रा. अनिल गवळी
प्रा. आनंद कुंभार


बीज : आनंदा मोरे । हिरवा श्रावण चिंब सरींचा : अंजली माने

महात्मा फुले : अपर्णा संकपाळ । हळद : अरुणकुमार सुर्वे

राजकारण—मतदान आणि स्त्री : नफिसा अत्तार

डॉ, आंबेडकर, परिवर्तनवाद आणि आजची स्थिती : शेखर जोशी

हायड्रोजन टुडे : दिग्वीजय भाट । निष्काम कर्मयोग : शिवराम कुलकर्णी

अनाथ : भूपाल दिवेकर । ... आणि-चोवीस कविता


Scanned with CamScanner

## प्रिन्स सिलेक्शन

**प्रिन्स** मधील एक्सक्लूझिव जेन्टस् आणि लेडिज रेडिमेडस् म्हणजे तुमच्या भारदस्त व्यक्तिमत्वाला मिळालेली नवी साथच ...!

## प्रिन्स टेलर्स

**शर्टस, ※ पॅन्टस ※ बलून बॅगीज**
**जीन्स ※ टीशर्टस ※ स्कर्टस टॉप्स**
**चुडीदर ※ मिडिज ※ लुजस**
**※ सलवार ※**

## PRINCE

MAIN ROAD,
GADHINGLAJ – 416 502.

ऋणको व धनको यांचे संबधातून श्रद्धा व विश्वासास पात्र ठरलेली

## महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या. हत्तीवडे

ता. आजरा जि. कोल्हापूर

**ऑडीट वर्ग ब**

| | |
|---|---|
| भागभांडवल– | ४,७०,२२० |
| ठेवी– | २५,००,००० |
| कर्ज– | ३२,००,००० |

आपल्या वर्तमान व भविष्य काळातील आर्थिक समस्या आमच्या विविध आकर्षक ठेव योजनेमुळे भाग घेऊन सोडवू शकाल तुमच्या विविध ठेव योजना आमच्याकडे आहेतच

**रामचंद्र धों. केसरकर** — चेअरमन
**मारुती. बा. चौगुले** — व्हा. चेअरमन

**श्री. मारुती जोतिबा चौगुले**
व्यवस्थापक

## न्यू बेन्झर सिलेक्शन

**प्रत्येक प्रसंगी शोभणारे न्यू बेन्झर मधील रेडिमेड कपडे.**

आधुनिक फॅशन युगातील उत्तम प्रतिचे कापड, अभिजात विविध रंग, अत्युत्तम पोत, नेमक्या मापाच्या आणि सर्वात माफक भाव याचे उत्तम प्रमाण म्हणजे न्यू बेन्झर मधील जेन्टस् व लेडिज रेडिमेडस्

**शर्टस, पॅन्टस, बलुल बॅगी पॅन्टस, जीन्स टि शर्टस. टॉप्स, स्कर्टस, चुडीदार, लुजर्स, सलवार, मिडिज.**

## न्यू बेन्झर सिलेक्शन

गडहिंग्लज–४१६५०२

उत्तम प्रतिसाठी आता अधिक किंमत द्यायची गरज नाही.

## जय शिवराय टी स्टॉल

**रुचकर पदार्थ मिळण्याचे. एकमेव ठिकाण**

शिवराज कॉलेज समोर, गडहिंग्लज.

प्रोप्रा. कदम बंधू



# वीज

– आनंदा मोरे
११ वी आर्टस्

कालच वळवाचा पाऊस पडून गेला होता आजही सूर्य आपल्या कडक उन्हाचा प्रताप दाखवत होता. अंगाची नुसती लाही लाही होत होती. कुठल्यातरी डोहात जावून उडी घ्यावीशी वाटत होतं. पोटात तहान नसतानाही नुसत्या थंडाव्यासाठी पाणी घोटावसं वाटत होतं. पाऊस कधीच पडून गेला, पण जमिनीच्या भळी मुजल्या नव्हत्या. परत त्या पावसाची वाट पहात तोंड पगळून बसल्या होत्या. उन्हाची कायली वाढतच होती. जिकडं पहावं तिकडं नुसतं रणरणतं उन्हच उन्ह होतं. त्याच्या झळा डोळ्यात आरपार घुसत होत्या. अंगावरचा घाम पुसला तरी पुन्हा येतच होता. आजही वळवाचा पाऊस पडेल असं चिन्ह दिसत होतं.

अशा ह्या उन्हात करपणाऱ्या गवताच्या खोपीत आबा बसला होता. दर्याच्या लाटेसारख्या येणाऱ्या उन्हाच्या झळा सोसत होता. अंगावरला घाम डोईच्या पटक्यानं पुसत होता. गाडग्यातलं थडगार पाणी ढोसत होता. आणि तरीही अगास गारवा काही मुरत नव्हता. समोरच्या आंब्याच्या झाडाला बांधलेल्या बैलाकड अधून मधून नजर टाकत होता. बैलांचं रवंथ वाढेल तर आबाच मनही रवंथ करायला लागायचं. काळजाला पडलेल्या खापात तो स्वत:ला बुडवून घ्यायचा. समोरचं थडगं बघून त्याच्या काळजाचे खाप उलगडायला लागायचे. मन सैरं भैरं व्हायचं. लकवा मारल्यागत अंग लुळं पडायचं.

आता हवेत एकीकडे उन्ह तर दुसरीकडे गार वारा अंगाला वाटत होता. तरीपण भगभग होतीच. आभाळात काळे ढग भरल्या कुशीनं जमायला लागले.

खोपी समोरल्या झाडाकडं आणि थडग्याकडं लागलेली आबाची नदर हुंदक्यासरशी ढळली. डोळ्यातलं पाणी पुसून काढत गाडग्यातलं पाणी पोटात घातलं. मनातले विचार त्यानं मुडपायचा प्रयत्न केला. त्याला ते नमलं नाही. मुंडकं डोगलात घालून परत थडग्याकडं नजर लावली. थडग्यात रुतलेल्या नशीबाला मनाच्या खोरं–कुदळीनं तो उकरायला लागला. एवढ्यात टपोऱ्या थेंबानी खोप तडतडायला लागली. पाण्याच्या धारा धरणीला भिडायला लागल्या. पाऊस सुरू झाला होता . . . वळवाचा पाऊस . . . मनाचे बांध फोडणारा वळवाचा पाऊस ! . . .

. . . आबा . . . चारचौघासारखं बायको–पोरांसाठी खपणारा आबा. लग्न झालं. दोन पोरी पदरात पडल्या. दुसऱ्या पोरीबरोबरच बायको गेली. आबाला दिशा अंधारल्यासारखं झालं. पण लगेचच ती उणीव भरून निघाली. पै–पाहुण्यांनी जबरदस्तीनं त्याला बोहल्यावर चढवलं. नवीन संसारात आबा गुंगून गेला. घरादाराला वारस म्हणून पोरगा मिळावा यासाठी कित्येक देवळांचे हुंबरे झिजवले. मागितलं ते मिळालं. पोरगा झाल्याच्या आनंदात पिपाणी न बघितलेल्या आबानं बेंड–बाजा लावून गावभर पेढे वाटले. मोठा होईपर्यंत आबाचा कडी खांदाच राऊचं अंगण. आबाचा राऊ सगळ्यांचा झाला, वाड्यातल्यांचा, गल्लीतल्यांचा सगळ्यांचा जीव राऊवर. सावत्र बहिणींचाही जीव त्याच्यावर. सख्या भावासारखी माया राऊवर त्यांनी उधळली. बोटाला धरून शाळेला नेलं. शाळेत कुठंच तो कमी पडला नाही आडाणी आबाचा पोरगा म्हणून सगळ्यानी नावजायचं.

राऊ सातवीच्या परीक्षेला बसला. केंद्रात नंबर काढला. साऱ्या गावानं राऊला डोक्यावर घेतला. आबाला तर त्याला कुठं ठेऊ नि कुठं नको असं झालं. मास्तरनी सांगितलं, 'चांगल्या हायस्कूलात घाला, पोरगं चीज करील.' ज्याच्या–त्याच्याकडं चांगल्या हायस्कूलची चौकशी आबा करायला लागला आणि मुंबईच्या बहिणीचं एक दिवस पत्र आलं, 'मुंबईत शाळा

Scanned with CamScanner

चौकशी आहे. नवऱ्यानं लवकरच राऊला पाठवायला सांगितलंय.'

उद्याच्या त्याच्या तोंडात एकच 'राऊ मुंबईतल्या शाळेत जातोय.' राऊ तर नाचायला लागला 'असली मुंबई–नसली मुंबई' असं त्यानं ऐकलं होतं. त्या मुंबईचा आता तो रहिवासी होणार होता. दिवस सरले आणि राऊ जाण्याचा दिवस उद्यावर येऊन ठेपला. घरात धडापड वाढली. बांधाबांध सुरू झाली आबा गोंधळागत झाला. हसावं काय रडावं असं त्याला झालं. पोरगं शिकायला जातंय आणि आपल्यापासून दूर जातंय. चिमुकला राऊ आबाच्या नजरेसमोर 'साहेब' म्हणून दिसायला लागला. मनाचा हिय्या करून आबानं राऊला आनंदानं पाठवायचं ठरवलं.

खरं, हे सारं देवाला मान्य नसावं. वळवाच्या पावसाची तगमग त्या दिवशी हवेत वाढत होती. दुपारीच राऊ आबापाशी आला आणि लाडानं म्हणाला,

'आबा, मी शेताला जाणार.'

'शेताकडं बरं चाललास रं ?'

'आंबे आणायला.'

'तेरं कशापाई ? आरं मुला, उद्या म्हमईला जायाचं न्हवं ? काय न्हालं बिलं ते बघ जा की '

'आक्काला आंबे न्यायला नकोत ? एवढ्यात येऊन येतो की ! '

आक्काला तिच्या आवडत्या आंब्याचे आंबे द्यायचे म्हणून पळतच शेत गाठलं. एव्हाना उष्णतेची तगमग बंद होऊन काळे काळे ढग गळ्यात जमायला लागले. पावसाची चोरपाय वेळात सुरुवात होणार, आकाश गडगडाट करायला लागलं. सारं आसमंत त्या आवाजानं भरून गेलं.

आपल्या आक्काला आंबे काढण्यासाठी पळत आलेला राऊ सावलीत झाडावर चढला. भराभर आंबे गोळा केले पिशवी भरली तसा तो उतरण्याच्या बेतात होता. राऊ भिजून चिंब झाला. झाडावरचे पाय सटकायला लागले. आंब्याची खांदा जड झाला. सगळीकडं पाणीच पाणी झालं सोसाट्याच्या वाऱ्यानं आंबा सारखा आळोखे पिळोखे देत होता. मधूनच विजेचा प्रचंड आवाज. आभाळाला चिर गेल्यागत वीज यायची आणि प्रचंड गर्जना करत लुप्त व्हायची.

अशाच एक विजेचा लोळ आभाळात उमटला. कडाडऽऽ आवाज झाला. गोंधळलेल्या राऊला आभाळ भडकतंय की काय असं वाटलं आणि– क्षणात राऊसह उभा चिरत तो लोळ झाडातून आरपार गेला. . . .

तेच ते आंब्याचं झाड. जळून काळं पडलेलं. एका बाजूनं वाळत चाललेलं . . . . आणि त्याच झाडाखाली . . . . राऊ ! आंबे वेचणारा, नाचणारा राऊ !

लुळ्या पडलेल्या अंगात ताकद संचारली. आबा उठला आणि बेभान पळत जाऊन 'राऊऽऽ' म्हणून झाडाला मिठी मारली . . . .

## विचारधारा

एरव्ही नुसता वाळवंट असलेला ओढा सुद्धा. पावसाळ्यात दुथडी भरून जातो. आनंदाच्या क्षणी मनुष्याचे रूक्ष मनही असेच बदलून जाते.

संकलन – नामदेव पाटील
बी. ए. भाग २

Scanned with CamScanner

# हिरवा श्रावण चिंब सरींचा

– अंजली आ. माने
विज्ञान भाग १

सकाळी सात वाजता आमचा प्रवास सुरू झाला. नऊला आम्ही आंबोलीत उतरलो, तेव्हा सर्वांनाच लक्ष समोरच्या एका छोट्या हॉटेलनं वेधून घेतलं. त्या कडाक्याच्या थंडीत एक ग्लास चहानं काय होणार ? पण म्हणतात ना– 'बुडत्याला काडीचा आधार !' सर्वांनी चहा घेतला व दहा वाजता आम्ही कलेक्शन-साठी हॉटेल बाहेर पडलो.

श्रावण महिन्यातले सृष्टीचे मोहक सौंदर्य पाहून ज्याचे मन प्रसन्न होत नाही असा मनुष्य शोधुन सापडणेंही कठीणच ! तसं पाहिलं तर सृष्टीदेवतेचं कोणतंही रुप हे सुंदरच असतं. तिच्या प्रत्येक दर्शनात काहीतरी आकर्षक व रमणीय अशी शक्ती असते, पण पाहण्याची रसिकता मात्र पाहिजे. श्रावणातील आंबोलीचं सृष्टीरुप तर इतकं मोहक व स्पष्ट होतं की कोणाच्या नजरेमधुन चुकुन सुटणंही शक्य नव्हतं. दुतर्फी हिरव्या राईतील काळयाभोर वाटेवरून आम्ही चालत होतो.

श्रावणाचं धारानृत्य सभोवती सुरू झालं की मनं आठवणींनी चिंब भिजत त्या 'मराठी कविता' आणि हा कवितेचा श्रावण शरीरभर भिनतो. मराठीतील कितीतरी कवींनी या धारानृत्यांचे वेगवेगळे सर गुंफले आहेत. अशा वातावरणात या सरी कशा टप्टप् बरसतात व नेहमीच हवीहवीशी वाटणारी प्रसन्नता आनद देणारी असते.

सृष्टीचे रंगरूप प्रत्येक ऋतूत बदलत असते. श्रावण महिन्यात पाऊस संपलेला नसतो. गडद हिरवी पाने वृक्षावर दिसू लागतात. पावसाच्या सुरात सूर मिसळून पाने सळसळतात. तेव्हा अगदी सर्वप्रथम आठवते ती मराठीतील अजरामर कविता जी पिढ्यान्-पिढ्या मराठी मनावर विराजमान झाली आहे ती– 'श्रावणमास.' श्रावणाचे इतके अल्लद चित्र बालकवींनीच रेखाटले असेल–

'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.'

या श्रावण कवितेवरून वाटतं की बालकवी निसर्गात सहज रंगून गेलेले आहेत. निसर्गाची कितीतरी बदलणारी रूपे पाहणे, त्यातील रंग, रूप, गंध, छायाप्रकाश यांच्या विविध छटांचा सौंदर्यास्वाद घेणे, त्यात गुंग होणे, त्यांच्याशी सुखसंवाद करणे हा त्यांच्या प्रतिभेचा धर्म आहे. कवीच्या व्यक्तित्वाच्या मिसळणाऱ्या रंगानी बालकवींची ही कविता अधिकाधिक गहिरी झालेली आहे, नाही का ?

विविध रगाचे रंगीबेरंगी कपडे परिधान केलेल्या सर्वांना फुलपांखरांचीच उपमा शोभत होती. फुल-पाखरांना पाहून केशवसुत म्हणतात–

'जेथे हिरवळ फार विलसते
लताद्रुमांची शोभा दिसते
तेथे फुलपांखरु पहा हे –
सुंदर बागडते.

काळयाभोर रुंद वाटेवरून चालताना याच कवितेतील पुढील ओळी आठवतात–

'तरल कल्पना जशी कविची
सुंदर विषयावरुनी साची
भ्रमण करी गती तशीच वाटे
'सहलीतील' फुलपाखरांची !

द. भा. धामस्करांची श्रावणसर तर निसर्गकिरण छेदितच पृथ्वीवर येते–

'तिसऱ्या दिवशी जिद्द संपली
हटवादी त्या रानफुलांची
येता श्रावण जिद्द लोपली
प्रकाशवैरी कृष्ण घनांची

शंकर वैद्य यांचा निसर्ग तर अप्रतिम असाच आहे. श्रावणातील निसर्गाचे भान त्यांनी ओळीओळीत गुंफलेले आहेत–

'मेघ सावळा फुलारुनिया विरघळला–अंबरी
कलत्या रविचे उन विचरीत आल्या–श्रावणसरी
तुषार चुंबून किरण कोवळे कलती–पूर्वेकडे
वसुंधरेला इंद्रधनुचे स्वप्न गुलाबी पडे !'

पाडगावकरांची श्रावणसर तर ऋतुचक्रापलिकडचे नाते उलगडते. श्रावणातील चित्रलिपी ते नकळत उलगडतात–

'श्रावणात चित्रलिपीचे
जरी अर्थ न कळले पुरते
तरी ऋतुचक्रापलिकडचे
प्राणात उमलते नाते...'

कवितेंच्या ओळीमधून कविंनी प्रकट केलेला श्रावण प्रत्येकानाच हवासा वाटतो कारण तो ऊन-पावसांचे हलके हलके खेळ करणारा आनंदाचे तुषार उडविणारा असतो. मराठी कवितेवर प्रेम करणाऱ्या सर्वांच्याच ओठातून बरसणारा श्रावण असतो, होय ना? आणि म्हणूनच वाटतं–

जे जे निसर्गरमणीय म्हणोनी काही ।
निर्माण होऊनि जगीं विलसोनि राही ॥
सौंदर्य तें नयनगोचर होय साचें ।
अज्ञेयशा भवनसुंदर ईश्वराचें ॥

या सर्व कवितांच्या श्रावणधारात पावसाचा थोडा विसर पडला होता. आजूबाजूच्या हिरवळीकडे पाहुन मध्येच काळाभोर वाटेवरून चालताना वाटत होतं, काळ्याभोर काठाच्या व हिरवागार शालू नेसलेल्या आंबोलीन 'नववधूचं रूप' धारण केलं आहे. हिरवळींमधून डोकावून स्वत:चं अस्तित्व पटवणारी पिवळी–लाल फुले म्हणजे जणू काय तिच्या शालूवर काढलेली नक्षीच.

आम्ही पायवाटेवरून जाण्यास निघालो तेव्हा रुंद अशा वाटेवरून अरुंद वाटेवर जाताना अगदी कसं दिल्लीतून गल्लीत आल्यासारखं वाटलं ! क्षणातच मी मागे पाहिलं खरंच साध्या, स्वच्छ, चकचकीत काळ्या रस्त्यात आकर्षून घेण्याचं इतकं सामर्थ्य असतं ते मला तेव्हा कळलं. थोड्या पायवाटेनंतर आम्ही दोन लाकडी पूल पार केले व खऱ्या प्रवासाची सुरुवात झाली. पाठोपाठ शंभर वळणं घेतलेल्या त्या पायवाटेचा थाट अगदी विशेषच होता.

फिरताना पाऊस थोडा कमी झाल्याने आम्ही सर्वजण आनंदाने पुढे जाऊ लागलो तोच पावसाने आपले रौद्र रूप धारण केले. त्यामुळे इतकी घसरट झाली की माझी एक मैत्रिण तीन वेळा पडली व तिला चिडवताना आमचेही पाय थोडे घसरले. तेथील सृष्टी फार आवडल्याने वृष्टीतच आम्ही तिला साष्टांग दंडवत घातले ! तशी माणसाला पडण्याची सवय असावीच लागते. त्याशिवाय उभं राहण्याची किंमत कळत नाही. तहानलेल्यानाच पाण्याची किंमत कळते, भुकेने व्याकुळलेल्यानाच अन्नाची किंमत कळते व पडलेल्यानाच दोन पायांची ! नाहीतर एरवी आपण त्यांच्याकडे किती लक्ष देतो. पायांचा विचारसुद्धा आपण करीत नाही. तुम्ही कधी केलात का ?

इतक्यातच खळखळणाऱ्या ओढ्याचा आवाज आला व पुन्हा बालकवी स्मरले ते म्हणजे रंगांचे शब्दचित्रांच्या तालबद्ध कवितेत करणारे !

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळासांवळा झरा वाहतो बेटा बेटांतुन ...

बालकवींच्या निसर्गचित्रणाच्या जितक्या कविता आठवाव्यात तितक्या कमीच. सौंदर्य, प्रेम, आनंद आणि संगीत यांनी बालकवींची निसर्गसृष्टी ओतप्रोत भरलेली

आहे. धुक्याला कवितेतून निसर्गातील धुक्याचे आगमन, भाव-विश्व उमलते आणि तेही निसर्ग सहजपणे, स्वाभाविकपणे. पण, धुके व ऊन यांची हलकी लडिवाळ झोंबी फुलपाखरा सारखी मनोकोशातून उलगडते !

बालकवींनी निसर्गाला आपल्या कवितेमधून सजीव केले आहे. निसर्गचित्रण करताना बालकवी ते दृश्य अतिशय हळुवारपणे टिपतात. सृष्टी सारिका, संध्या-रजनी, सकाळच्या किरणांनी फुलविती फुले, निळी छटा, हिरवी कुरणे या साऱ्या गोष्टींकडे बालकवी मोठ्या आत्मीयतेने बघतात. बाजूलाच हिरवी राई, वळणावळणांची वाट व समोर खळाळता झरा पाहून वाटते–

"ती सांगेल सुंदर दूर दूरची शाई
पाहील मग ती हिरव्या हिरव्या राई
ती निर्मळ जलाशय वळणे वळणे घेत,
हिरवेगार रान्यांच्या शीतल कुंजवनात."

श्रावणातल्या पर्वतांचा निळा रंग, ओढ्यातून वाहणारे पांढरेशुभ्र रंगाचे पाणी आणि जिकडे तिकडे पसरलेला हिरवळीचा रंग, ही रंगाची किमया, विविध छटा कोणत्या शब्दात कोरायच्या. तरीही आठवतात त्या बालकवींच्या ओळी–

"इंद्रनिळीचा रंग बहुरंगी गिरिच्या अंगाला
मधून जळाची शुभ्र शोभते ती मीलनमाला
श्रीमाऊली थाट मांडला हा हिरवळीचा..."

जसं जसं आम्ही झऱ्याजवळ गेलो व पाण्याचा आवाज ऐकू लागलो तसं सर्वजणच घाबरले. तेव्हा मी तर फारच घाबरले. तेव्हा सर्व कवि व त्यांच्या कवितांना अगदी 'पूर्णविरामच' दिला. माझ्या सर्व मैत्रिणींनी तो ओढा पार केला. मला मात्र शेवटी थांबावं लागलं पण शेवटी का असेना मी ही तो झरा पार केला. तारेवरची कसरत करीत जेव्हा मी तो झरा पार केला तेव्हा विम्बल्डन जिंकलेल्या स्टेफी ग्राफ सारखाच आनंद झाला. सारखं सारखं आपलं शेवटी पाहून यावर अतिशय विनोदी कविता पंडित सप्रे यांनी लिहिली आहे.

'राहुसी धुक्याला सून अखेरी खाली
का मंद मंदा रे त्यासवे वाटून घेसी ?
हा स्यायन मग 'शाल' नि 'शिपा' वरती
व माणिकमोती खाली सिधुतळाशी'

खरंच यामध्ये किती सुंदर विनोद निर्माण झाला आहे ! शाल नि शिपा वरती व माणिकमोती सिधुतळाशी खाली !

दुपारी चार वाजता आम्ही हिरण्यकेशीच्या उगमस्थानी पोहोचलो. तेथीकडे मोठी झाडे व मग्रे देवालय. देव आहे की नाही हे मला माहीत नाही पण दैवी शक्ती आहे हे मात्र खर. ती जर नसती तर घनदाट सृष्टी व भरधार वृष्टीवर कृपेची दृष्टी ठेवणाऱ्या त्या देवालयासमोर कुणीच हात जोडले नसते.

थोड्या वेळातच आम्ही तेथून परतलो तर ओढ्याचा वेग फारच वाढला होता. पावसाचा वेग तर त्यापेक्षा सुद्धा जास्त होता. ते पाहुन सर नवीन मार्ग शोधण्यास निघाले. कारण ओढ्याचं पाणी खूपच वाढलं होतं. तेव्हा तशा त्या परिस्थितीतसुद्धा आम्हाला इतिहासातील नवीन मार्ग शोधणारा 'कोलंबस' आठवला. सरांनी तो मार्ग शोधला व एक महासंकट टळल्याचा आनंद सर्वांना झाला.

आम्ही सर्व मुलींनी इकडची तिकडची चार-पाच पानं फुलं एकत्र केली व बोलण्याच्या नादात ती ही टाकून दिली. कारण पाऊसच असा होता की छत्री बॅगांना सांभाळूपर्यंत पुरेवाट झाली मग 'कलेक्शन' नी कसलं करणार ?

पावसाच्या त्या धारानृत्यात, तुफान वाऱ्यात अभिनय न करता सुद्धा निसर्गाकडून अप्रतिम असा अभिनय घडवून घेतला जात होता. यावेळचे वर्णन माडगूळकरांच्या कवितेतच वाचावं–

'लवते वेली हलते झाड
विजयाआधी धुंद पवाड
'घनदृत्य' या उडते माती
गुलाल होती आहे.'

अशा या पावसात सर्वत्र दाट धुक्यांनी आपलं साम्राज्य पसरवलं होतं. सूर्यबिंबास झाकून स्वतःचं अस्तित्व पटवणाऱ्या या धुक्याचं वर्णन वसंत सावंत यांनी अगदी सुंदर रेखाटलेलं आहे–

'दूर नभांच्या पल्याड आहे उभा कुणी श्रीरंग
उधळित पिंजर तरल धुक्याची झाडावरती रंग'

जोरदार पावसामुळे झाडांची लहान–लहान पाने खाली वाकली होती जणू काय ती खालच्या मोठ्या पानातल्या आरशात स्वतःच्या भवितव्याच प्रतिबिंबच न्याहाळत होती. झाडाखाली असलेल्या दगडावर पाणी पडत होतं तेव्हा वाटलं– 'खळाळते खडकावर हंसापरी शुभ्र पाणी !'

परचुरे प्रकाशनाने कुसुमाग्रजांचा श्रावण हा संग्रह प्रसिद्ध केला. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर सुभाष अवचट यांनी नेमक्या रंगानी वेढलेला श्रावण तर आत कुसुमाग्रजांचा मन प्रसन्न करणारा श्रावण. या श्रावण स्वागताच्या श्रावणसरी चिन्मय आनंद देणाऱ्याच आहेत–

'हासरा नाचरा जरासा लाजरा
सुंदर साजरा श्रावण आला
तांबुस कोमल पाउल टाकीत
भिजल्या मातीत श्रावण आला.'

आनंदाचा मेघ मनात बरसविणाऱ्या या श्रावणाच कौतुक करावं तितकं थोडंच !

अनेक मृग रानोवनी फिरतात पण कस्तुरीमृगा मध्येच कस्तुरीदर्प असतो. अनेक वृक्ष वाऱ्यावर डोलतात. पण चंदनवृक्षच नीलाकाशात सुगंध–गीते गात गात लहरतो, दरवळतो. भारतात अनेक नद्या वाहतात पण गंगाजलाला अतिश्रेष्ठत्व मिळतं. अनेकात हिमालयालाच गौरीशंकराच्या सानिध्याने महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक ऋतू असतात, सृष्टीची अनेक रुपं, अनेक रंग, अनेक नाद, अनेक रेखा पण श्रावणातील सृष्टीतील 'नववधू' सारखं सजलेलं नटलेलं मोहक रुप कोण विसरू शकेल का ? अर्थात् नाही. कारण ते अनेकातील एक अनन्यसाधारण असंच 'सौंदर्य' ! श्रावणाला एक सर्वश्रेष्ठ वरदान लाभलं आहे. ते म्हणजे उन्हाळ्यामध्ये सृष्टीस आलेलं दरिद्र पार धुऊन तिला तृप्त करण्याचं !

या सर्व गोष्टीच्या नादात जेवणाची आठवण कुणालाच झाली नाही. आता मात्र होत होती. एका मंदिरात आम्ही तीन वाजता जेवण घेतलं. बसस्टॉपकडे गेलो. सर्यांचेच लक्ष गडहिंग्लजकडे जाणाऱ्या एस. टी. कडे लागले होते. चारच्या एस. टी. ने आम्ही परतलो.

लहानपणी पाचवीला असताना अजंठा, वेरुळ, शिर्डी, औरंगाबाद, दौलताबाद, तुळजापूर, पंढरपूर व देहु–आळंदी येथील दहा दिवसांच्या सहलीला मी गेले होते. ते वडिलांच्या शाळेच्या सहलीमधून. ते दहा दिवस मला अतिशय कंटाळवाणे गेले. प्रवासाचा खूप वैताग आला. पण दहा दिवसांच्या या सहलीत मला जो आनंद मिळाला नाही त्याहुनही जास्त आनंद दहा तासांच्या आंबोलीसारख्या जवळच्या सहलीत मी मिळवला.

अखेरीस सुरूवात तिथे शेवट असतोच ! मग ती कितीही सुंदर घटना असो. आमची सहलसुद्धा संपली.

गाडीमधून उतरताना सर्वांच्या चेहऱ्यावरचं हास्य टिपताना शेवटी आठवला तो मुकेशचा आवाज-

'सुहाना सफर और ये मौसम हँसी
हमें दर्द है की हम खो न जाए कही।'

पण काही असो काहीना ही सहल म्हणून काही दिवस आठवेल. काहीना काही वर्षे, पण मला मात्र अविस्मरणीय !



# महात्मा फुले

– कु. अपर्णा संकपाळ
११ वी विज्ञान

इंग्रजी शाळेत शिकत असणाऱ्या एका मित्राच्या लग्नसमारंभाला, मित्राने आग्रहाने बोलविले. म्हणून जोतिबा गेले होते. पण तिथे ब्राह्मणांनी त्यांचा कनिष्ठ जातीचा म्हणून अपमान केला त्या रागात ते गेल्या पावली परतले. त्यांनी झालेला सर्व प्रकार आपल्या वडिलां-समोर सांगितला. त्यावेळी त्यांच्या वडिलांनाही खूप वाईट वाटले. ते म्हणाले, 'तू मोठा झाल्यावर तुला याच विरोधाला तोंड द्यावं लागणार आहे. अनेकांशी झगडावं, झुंजावं लागणार आहे. ते सामर्थ्य तुला लाभावं हाच माझा आशिर्वाद !' हा प्रसंग महात्मा फुले यांच्या जीवनाला विधायक असे परिवर्तन देणारा ठरला.

१९ व्या शतकात बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, लोकहितवादी, आगरकर, टिळक इत्यादी सुधारक झाले. ह्या सुधारकांमध्ये महात्मा फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल २७ नोव्हेंबर १९९० हा त्यांचा शंभरावा स्मृतिदिन; त्या निमित्ताने त्याचे पुण्यस्मरण ! आज बुद्ध-अशोकांनी निर्माण केलेली प्रताप–शिवाजीनी वाढविलेली, नामदेव–तुकारामांनी आधारलेली अशी भारतीय संस्कृती नाश पावते आहे. दलितांना बरोबर घेऊन, शिणल्या भागलेल्यांना हाताशी धरून, रंजल्या गांजलेल्यांना आधार देऊन त्यातून वाट कशी काढायची ? हा प्रश्न आजच्यासारखा तेव्हादेखील तीव्र होता. अशा काळात १८२७ साली म. फुलेचा जन्म झाला.

साधा कुडता, धोतर, डोक्यावर पटका, खांद्यावर उपरणे अशी त्यांची साधी राहणी होती. त्यांची पत्नी एक धाडसी आणि कर्तृत्ववान स्त्री होती. स्वतःचे आयुष्य आपल्या पतीच्या शब्दाखातर त्यांनी स्त्रियां-साठी अर्पण केले. पतीकडूनच त्यांनी शिक्षण घेतले. इंग्रजी माध्यमात त्यांनी प्राविण्य मिळविले ही गोष्ट कौतुकास्पद होती. अशा सामर्थ्यवान पत्नीच्या साह्याने फुलेंनी सामाजिक सुधारणांचा पाया घातला. पुण्यामध्ये १८५१ मध्ये त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा सुरू केली. अस्पृश्यासाठी आपल्या घरी पाण्याची व शिक्षणाची सोय केली. बालविवाहास त्यांचा सक्त विरोध होता. ते म्हणत, 'ज्या मुलां–मुलींना स्वतःचं काहीच कळत नाही अशा मुलामुलींचे विवाह अशा बालवयात करणे योग्य नव्हे.' त्यांच्या विचारात पुर्नविवाहास मान्यता होती.

इंग्रजी सत्ता हिंदुस्थानात स्थिरस्थावर झाल्यावर शिक्षण विषयक सुधारणांचा विचार करून एक कमिटी नेमली गेली. तेव्हा प्राथमिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी सरकारने डब्ल्यू इंटर यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली. ही समिती १८८२ च्या सुमारास हिंदुस्थानात आली. समितीपुढे निरनिराळ्या जमातीच्या छोट्या मोठ्या पुढाऱ्यांच्या साक्षी झाल्या. प्रत्येकाने सरकारी धोरणापुढे मान तुकवली. 'मायबाप सरकार करील त्यास आमचा पाठिंबा राहील' असेच ज्याने त्याने वक्तृत्व केले. पण जोतिबांनी १९ ऑक्टोबर १९८२ रोजी आपल्या साक्षीत, सरकारने १२ वर्षा-खालील मुलामुलीसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले पाहिजे असे ठणकावून सांगितले. इंग्रज सरकार आपला पैसा; जो पैसा श्रमिकांच्या घामातून येतो तो श्रीमंत व उच्च वर्गाच्या शिक्षणावर खर्च करते; तो पैसा इंग्रज सरकारने सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणावर खर्च करावा असे स्पष्टीकरण महात्मा फुले यांनी केले. या गोष्टीस बऱ्याच बुद्धीमंतांनी विरोध केला. शंभर वर्षापूवी परकीय सरकारकडे केलेली मागणी स्वराज्यात पूर्ण झाली नाही, यावरून जोतिबांचे द्रष्टेपण समजून येतें. सुधारणेचे मूळ शिक्षणात आहे. समाज परिवर्तन साधावयाचे असेल तर ज्ञान ही प्रभावी शक्ती आहे हे त्यांनी जाणले होते. म्हणूनच

Scanned with CamScanner

यांनी पुण्यात मुलीसाठी आणि अस्पृश्य वर्गासाठी शाळा उघडल्या.

सर्वांना एकत्र साधण्यासाठी, मानवतेची हाक जगाला ऐकू जाण्यासाठी फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. कायमच्या संघटनेशिवाय समाजकार्य भरीव होऊ शकत नाही हे त्यांनी जाणले. 'सत्यापरता नाही धर्म । सत्य हेचि परब्रह्म ।' अशी विनंतीपत्रके त्यांनी काढली. जोतिबा सत्याशिवाय दुसरा धर्म मानीत नसत. त्याचप्रमाणे त्यांनी 'सत्यशोधक' हे दैनिकही सुरू केले. ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, सत्यस्वरुपी आहे. सर्व मानव त्याची लेकरे आहेत. ईश्वरभक्ती करण्यास प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. मनुष्य जातीने श्रेष्ठ नसून तो गुणाने श्रेष्ठ आहे. कोणताही धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत नाही. परमेश्वर सावयवरुपाने अवतार घेत नाही. पुनर्जन्म, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत. धार्मिक भेद व तंटे चुकीचे आहेत असे तत्वज्ञान या सत्यशोधक समाजाचे होते.

देवधर्माइतकेच लग्नविधीलाही स्थान आहे. हिंदू समाजात लग्नविधी पवित्र मानतात. दोन जीवांचे मीलन म्हणजे लग्न. लग्नगाठ एकदा मारली की जन्मभर सुटायची नाही. लग्न हे वंधन नसून स्त्री–पुरुषाच्या पूर्णत्वाचे ते एक प्रतीक आहे. पण लग्नविधी म्हणजे काय ? हे त्या वधूवरांना समजले पाहिजे त्या मंत्राचे अर्थ त्यांना समजले पाहिजेत. नाहीतर ते बाहुला–बाहुलीचे लग्न व्हावयाचे. पूर्वी लग्नविधीत भलताच गोंधळ होऊन दोन्ही घराणी एकमेकांची कायमची वैरी व्हावयाची. जोतिबांनी या लग्नविधी-विरुद्ध प्रथमच लिखान केले. भट–भिक्षुक ही लग्नातील दलाली त्यांनी नाकारली. नव्या धर्तीच्या मंगलाष्टका त्यांनी स्वत: निर्माण केल्या. लग्नविधी म्हणजे भिक्षुकशाहीचे राखीव कुरण असे फुलेंना वाटत होते. २५ डिसेंबर १८७३ रोजी प्रथमच बिनभिक्षुकाचा विवाह संपन्न झाला. हा मान वर सीताराम व वधू राधाबाई यांना मिळाला. समाज परिवर्तनाच्या मार्गातील महात्मा फुलेंचे हे एक पुढचे पाऊलच होते.

फुल्यांनी विधवाविवाहास प्रोत्साहन दिले. कारण त्याकाळी एखाद्या स्त्रीचा पती वारला म्हणजे तिला आपले आयुष्य खप त्रासातुन काढावे लागे. तसेच पुरुषांच्या वासनापूर्तीला काही विधवा स्त्रिया बळी पडत. त्याचे प्रायश्चित स्त्रियांना भोगावे लागे. त्याच्या पापाचे साक्षीदार नाहीसे करून स्त्रियांनी बालहत्येचे पातक आपल्या माथी घेऊ नये म्हणून जोतिबांनी १८६४ साली स्वतःच्या वाड्यातच एक प्रसुतिगृह व बालहत्या–प्रतिबंधक गृह स्थापन केले. त्याचप्रमाणे त्यांनी विधवांच्या केशवपनास विरोध केला.

भारतीय समाजाने हजारो वर्षे अस्पृश्यांना धुळीस मिळविले होते. त्यांच्या खाण्यापिण्याची तर काळजी कोण करीत नव्हतेच. पण त्यांना सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्याचे स्वातंत्र्यसुद्धा नव्हते. अशा लोकांना जोतिबांनी ज्ञानामृताबरोबरच स्वतःच्या घराचा पाण्याचा हौद सर्वांना खुला केला. त्यानंतर जमीनदाराविरुद्ध बंड पुकारले. शेतकऱ्यांना संप यशस्वी करून दाखवला. १८८५ सालातील ह्या घटना आहेत. भांडवलशाही आणि जमिनदारी ही प्रगतीच्या मार्गातील खीळ आहे. हे या देशात कम्युनिझम येण्या-पूर्वी जोतिबांनी सांगितले. या चळवळीसाठी लोखंडे, भालेराव हे त्यांचे सहकारीही कार्यरत होते.

'शेतकऱ्यांचा असूड' या पुस्तकात त्यांनी शिक्षण नसल्याने शेतकऱ्यांची अवस्था कशी बिकट होते हे पुढील ओळीद्वारे स्पष्ट केले आहे,

'विद्येविना मति गेली । मतीविना नीती गेली।
नीतिविना गती गेली गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ अविद्ये नेकेले।'

त्यांनी आपले 'गुलामगिरी' हे शेतकरी शूद्रवर्णीय व स्त्रीवर्ग यांच्या समस्यावर लिहिलेले पुस्तक अमेरिकन निग्रो चळवळीला अर्पण केले आहे. कमीत कमी शब्दात जास्त आशय आणि प्रश्नोत्तर रुपाने विषयाची मांडणी हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्टय सांगता येते. त्याचप्रमाणे त्यांनी रुढी व अंधश्रद्धेवर 'ब्राह्मणांचे कसब अथवा सार्वजनिक सत्यधर्म नावाचे पुस्तक लिहिले. महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळाने समग्र फुले वाङ्मय प्रकाशित केले आहे.

समाजास ज्ञानदीप दाखविणारा हा युगपुरुष ! जोतिबांच्या हिरक–महोत्सवाच्या दिवशी समाजाने मोठ्या प्रेमाने व बहुमानाने त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. या थोर पुरुषास शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त माझा विनम्र प्रणाम !

Scanned with CamScanner

# हळद

– अरुणकुमार सुर्वे
वाणिज्य भाग ३

दुपारचे बारा वाजून गेले होते. अजुनही मांडवाची सजावट चालू होती. जीवणू इकडून तिकडे धावपळ करत होता. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या तरी कामात गढून गेलं होतं. कोणीतरी पाण्यासाठी गाडी जुंपली होती. जीवणूच्या सवंगड्यानी त्याला भरपूर मदत केली होती. घरची रंगरंगोटी, सजावट केली होती. आता मांडवात लाईटची सोय केली जात होती.

सगळ्या शेजारण्या–पाजारण्या जमल्या होत्या. पोरा–टारांनी तर ओरडून मांडव डोईवर घेतला होता. त्यांचं खिसं चिरमुऱ्यांनी गच्च भरलं होतं. अजुन फराळाचा फडशा पडतच होता. गणू प्रत्येकास बोलावून पोरीच्या लग्नाचा फराळ देत होता. स्पिकर चालूच होतं. गावात सगळीकडे लग्नाचे स्पिकर घुमत होते. त्यांचे आवाज एकमेकात मिसळत होते. इकडे घरात शांतीच्या मैत्रिणी तिला घेर घालून बसल्या होत्या. शांतीचा चेहरा अगदी मोहरून आला होता. एकीकडे आनंद तर एकीकडे माहेरचं घर सोडल्याचं दुःख. पोरींची तर हसवा–हसवी, चिडवा–चिडवी चालूच होती. त्यात तिचा चेहरा पिकल्या उंबरासारखा लालेलाल झाला होता. शांतीच्या अंगाला थोड्या वेळानं हळद लागणार होती. होवळ्या इकडुन तिकडे, तिकडून इकडे करत होत्या. करवल्या नववधूला लाली–मेहंदीनं सजवत होत्या. अन् स्वतःही सजत होत्या. शांतीच्या मैत्रिणी तिची थट्टा–मस्करी करीत होत्या एखादी म्हणायची,

"काय गं शांते रमल ना तुला तिकडं ?"

"काय तरीच काय एकदा नवऱ्याच्या सेवेत गुतली की आमची याद सुदीक यायची न्हाय तिला," दुसरी म्हणाली. अन् तिसरीनं तर वेगळाच टोमणा मारला,

"कधी आलोच म्हंगावला तर तांब्याभर पाणी तरी देशील नव्हं ?"

"काय गं, वळख सुद्धा इसारशील ?"

तेव्हा शांती रुसल्याचं खोटं नाटक करायची. मग सगळ्याच तिचा रुसवा काढत होत्या. इतक्यात शांतीची आजी तिथं आली. आजी आली अन् पोरी गप्पगार झाल्या. शांतीची आजी कडक डोक्याची होती. सगळीच तिला टरकून असायची.

"पोरींनो, चहा बी घेतल्याशी की नाही ?" म्हातारी म्हणाली. आता मात्र पोरी बुचकळ्यात पडल्या.

"आणि जराश्यानं हळद वाजत येईल, मग सगळ्यांची धांदल व्हईल आणि तुम्हासनं सवड कशी ती न्हाई मिळायची," पुन्हा तिनं खात्री दिली.

बाहेर स्पिकर चालूच होता. हिंदी अन् कोळी गितांनी स्पिकर दमलं, आता हळदीला शोभेल असं– 'हिच्या अंगाला हळद लावा...' म्हणून मोठ्यानं घुमत होतं.

सांज झाली. पोरं मांडवात खेळत होती. नको तिथली पोरं येवून मांडव भरला होता. कुणाचा आवाज असा स्पष्ट ऐकू येत नव्हता. रंगीबेरंगी लाईटच्या माळा झगझगत होत्या. त्याच्यात तर पोरांना नाचायला ऊत आला होता. कोणी कुणाला ढकलत होतं तर कळकोटी पोरं उगाचच खेळणाऱ्या पोरांना मारून पळत होती. अन् त्यात एखादं भोकांड पसरून रडत घरात येत होतं. "भरल्या घरात रडताय का ?" म्हणून धप्पाटा खात होतं.

आता बरीच सांज झाली. दिवस बुडला तरी हळद वाजण्याचा पत्ता नाही. अजून हळदच का आली

नाही म्हणून म्हातारा गणू सगळ्यांना विचारत होता, "बंळगाव गाडी यली का ?" पुन्हः "हिंग्लज गाडी यली का ?" प्रत्येक गाडी येवूनच जात होती. पण हळद काय येतच नव्हती, तसा म्हाताऱ्याचा चेहरा उतरत होता.

जीवणूनं तर एस टी. स्टँडवर ठाण माडलं होतं. पण गाडीचा काही पत्ता नाही. गाडी वेशीत आली की पळत-पळत दरवाज्यात यायचा अन् ओळखीचा कोण नसेल तर हताश होऊन परत बापूच्या दुकानात जावून बसायचा. पानवाला बापू म्हणाला, "का गा, जीवणू कुणाची वाट बघतोस ? का ? पाव्हणं अजून कोण न्हाईल्यात ? हळद आली नव्हं ?"

त्यावर जीवणू म्हणाला, 'न्हाई गा तेच तर बघतोय नव्हं." हे बोलणं चालू असतानाच जीवणूला पाराकडं कोणीतरी कुजबूजत असलेलं ऐकू आलं. इकडे बापू बरोबर गप्पा मारता मारता तो कान टवकारून ऐकू लागला. त्यातला एकजन म्हणाला,

"अजून अशी कशी हळद न्हाईल गा, नरसुदा?"

"तस नव्हं देसाय मास्तर, , मला बी थोडा संशयच यतो म्हणाकी," दुसरा म्हणाला.

"त्यो कसला गा? पोर काय वाईट हाय? सातवी पर्यंत शिकल्याली हाय, नाकाडोळ्यांनी बी झ्याक हाय."

"व्हय खरं, तरी बी नवरा मुलगा काय बी शिकल्याला न्हाय, घरची शेती बी न्हाय, बाप म्हातारा, पोरगा म्हमईस कसल्या तरी कामास असल," इकडे-तिकडे बघत नरसुदा हळूच म्हणाला.

"मग काय झालं त्यात ? ह्येचं बी देण्याघेण्यात चोक झालंय सगळं, प्वार राबलं, म्हाताऱ्यान ह्यात घाणवाट टाकलंय, एकटोच पोर हाय लगीन अगदी झक्कास पार पाडतील," देसाई मास्तर म्हणाले.

"ते तर झालच सगळं, पोर बी कामाची हाय, न्हाईल राबून. गोडी गुलाबीनं न्हाली म्हंजी झालं."

थोडा वेळ थांबून अचानक नरसुदा काय तरी आठवल्यासारखा बोलला, "मास्तर, तुमाला त्यो शेवंता मामा म्हाईत असलच की, त्यो बघा पक्का आमदार त्यो म्हणं शांतीला आपल्या पोराला करतो म्हणत व्हता आणि काय तरी झालं आणि त्येंच्यात खटकं उडालं.

"त्यो मोठा राजकारणी माणूस, प्वार बी काय धड स्वभावाचं नाही. त्येंच्या वरात आणि पोरी ? छ्या !" देसाई मास्तर म्हणाले.

"पर, त्येचं तरी काही कारस्थान नसलं नव्हं ?"

अन् अचानक गाडी आली, देसाई मास्तरांनी निरोप घेतला. गाडी थांबली तसा जीवणू दरवाज्याकडं पळाला. पण आता सुद्धा कोणी आलेलं नव्हतं.

इकडे म्हातारा एकदम खिन्न होवून बसला होता. पुन्हा पुन्हा सगळ्यांना विचारत होता.

"किनीट पडली तरी अजून गाड्या कशा न्हातील?" म्हातारा चिंतेच्या स्वरात म्हणाला.

"यईल गा, अजून वस्तीच्या दोन गाड्या न्हाईत न्हवं ? रामूदानं त्याचं समाधान करण्याचा प्रयत्न केला.

"व्हय गा, पर त्यो जीवण्या तरी कुठं न्हाइला अजून ? परत तेच.

"तिकडंच कुठं गेलाय नव्हं," रामूदा.

इतक्यात रामूदा गल्लीच्या खालच्या बाजूला बघत म्हणाला, "त्यो गा, त्यो काय आलाच की, जीवणूच नव्हं त्यो ?"

"व्हय खर ! पर एकटाच येतोय नव्हं ?"

सगळ्यांचे संवाद प्रश्नातच. सर्वांसमोर आता फक्त प्रश्नचिन्हच उभं होतं. सगळ्यांचे हात कामावरचे थांबले होते. जो तो फक्त हळद येण्याची वाट बघत होता. अन् स्पिकर आपलं वाजतच होतं.



Scanned with CamScanner

जीवणू आला तशी घरात सगळ्यांची हालचाल झाली. जो तो विचारत होता, "काय झालं पोरा ? काय पाव्हनं मारुतीच्या देवळात बसवून आलिस काय ? गाड्या सगळ्याच संपल्या काय ?" अनेक प्रश्नांची बाणांच्या वर्षावासारखी हल्ला चढवत होती.

जीवणू ताडकन् आत गेला, स्पिकर बंद केलं. अन् डोकं धरून गप्पच पेंढीच्या पोत्यावर बसला. आता स्पिकरही बंद झालं, अन् रंगीत लाइटच्या माळाही बंद झाल्या. आता सगळीच डोकीला हात लावून बसली. वस्तीच्या दोन्ही गाड्या आल्या होत्या. जो तो शंकेत होता. सर्वांसमोर आता मस्तं मोठं एकच प्रश्न चिन्ह उभं होतं,

'हळद का आली नाही ?''

"त्यांनी सांगावा तरी धाडायचा व्हता," रामुदा म्हणाला.

"खरं असं–कसं झालं ? गाड्या सगळ्याच कशा चुकल्या असतील? " बाबू सोनार म्हणाला.

रात्रीचे नऊ वाजून गेले तरी कशाचाच पत्ता नव्हता. सैंपाकी सुद्धा 'माळावर चुल लावावी अन् अचानक पाऊस येऊन चुल विझल्यासारखे गप्प बसले होते.' जीवणूचा मित्र बाळू आला आणि म्हणाला,

"जीवणू, असं बसून काय व्हतंय ? चल वंडू मास्तरांची सायकल तेवढी मागून घे. मी आणि न्हाव्याचा तुक्या जावून येताव." तसा जीवणू उठला आणि बाहेर निघून गेला. इकडं पोरं पोटात कावळे ओरडत होते म्हणून आकांत करत होती. रडून रडून झोपत होती. काही काळ असाच नादुरुस्त बत्तीसारखा पळून निघून गेला. कुणाच्या गल्लीत बँड जोरात वाजत होते. कुणाची तरी हळद वाजत आली, तशी पोरं नाचत आली, 'हळद आली ! हळद आली !!' आली तशी वाजत 'हळद' महार वाड्याकडं निघून गेली. सगळीच हताश झाली. शांतीनं तर रडून गोंधळ घातला होता. अन् म्हातारी भलताच संताप करून शाप देत होती, 'कुठल्या रांडचं काय, भाड्याचं काम हाय, ह्येला अर्धसकाळ नेवून देत." कुत्तर कुत्री भुंकत होती. रात्र भलीच गेली. बारा वाजले तरी गेल्या माणसांचाही पत्ता नाही. रात किडे किरकिरत होते. अन् प्रसंग भलताच काळा करत होते.

इतक्यात बाळू जीवणू आणि तुका सुद्धा आला. बाळू थेट घरात गेला. अन् स्पिकर चालू केला. रंगीत लाइटांच्या माळा झगझगल्या स्पिकर घुमला. हळदीची माणसं टेम्पोतनं आली होती. तुकाला तर सगळ्यांनी घेरच घातला. तो सांगत होता,

"तसं नव्हे, नवराच मुंबईसनं आला नव्हता. त्याला गाडी चुकली. एस्टीत बसला अन् झोपला, तसाच पुढं आपलं ठिकाण सोडुन गेला. म्हणून एवढा येळ झाला. झालं नव्हे समाधान ? चला सगळी कामाला लागा बघुया."

होवळच्यांनी भाताचा घणा घातला. पाच जणी सडायला लागल्या. आपल्या स्वरात गायला लागल्या..

'व्हयो व्हयो, घणा घातला खंडीचा, गव्हाचा
मांडव देवाचा, मांडव गोताचा दणका भारी....'

शांती हळदीनं माखून हळद झाली.

## विचारधारा

आशेने दोरी बांधून ठेवली की मनाचा पतंग आकाशात भरारी मारतो.

संकलन – **नामदेव पाटील**
बी. ए. भाग २

# राजकारण-मतदान आणि स्त्री

– कु. नफिसा एम्. अत्तार
बी. ए. भाग ३

भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही भारतात आहे. लोकशाहीचा महत्वाचा भाग म्हणजे निवडणुका. निवडणुकांद्वारेच आपणाला योग्य असा नेता निवडण्याची, राष्ट्रीय कार्यात सहभाग घेण्याची, नवभारत निर्मितीत हातभार लावण्याची संधी मिळते.

निवडणुका हा लोकशाहीचा आत्मा आहे.

निवडणुकीत स्त्री–पुरुषांना समसमान अधिकार देण्यात आले आहेत. प्रत्येक अठरा वर्षे पूर्ण झालेल्या भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार प्राप्त होतो. त्यात स्त्री–पुरुष असा भेदाभेद केला जात नाही. घरकामा व्यतिरिक्त राजकारणात सहभागी होण्याची संधी प्रत्येक स्त्रीला मिळतेच. निवडणूक प्रक्रियेचे आधारभूत घटक म्हणून स्त्री–पुरुषांना समान मूल्य आहे. आतापर्यंत भारतात ज्या नऊ सार्वत्रिक निवडणुका झाल्या, त्यात सरासरी मतदान पंचावन्न टक्के झाले आहे, त्यातील निम्मे स्त्री मतदार आहेत.

स्त्रियांचे मतदान प्रमाण कमी असते. पण ज्या स्त्रिया मतदान करतात त्यांचा दृष्टीकोन वेगवेगळया प्रकारचा असतो. उदा.– भावनिक, तात्कालिक, जातीयवादी उदासिन, परंपराबद्ध किंवा सुधारणावादी दृष्टीकोनातून त्या मतदान करतात. शक्यतो सुशिक्षित, नोकरदार स्त्रिया सारासार विचार करून, सद्य:परिस्थितीचा विचार करून, पक्षाचा जाहीरनामा, उमेदवार व कार्य पाहून मतदान करतात. पण यातून एक तरी स्त्री अशी असते की ती उदासिनपणे कोणाचे तरी ऐकून स्वत:चे मत देऊन येते. स्त्रिया भावनाशिल व हळव्या असतात. जर कोणत्याही उमेदवाराने भावनाप्रधान, अंत:करणाला भिडणारे भाषण केले असेल व श्रोतृवर्गात आमच्या मतदार भगिनी असतील तर कमीत कमी चाळीस ते पन्नास टक्के मतदान त्या उमेदवाराच्या बाजूने होऊ शकते मग तो उमेदवार कसाही असला तरी चालेल. तर काही स्त्रिया अगोदर कोणताही यथायोग्य विचार न करता उदासिनपणे मतपत्रिकेतील कोणत्याही उमेदवाराला मत देऊन आपला अधिकार बजावतात.

काही घराण्यामध्ये अमूक एका पक्षालाच मत द्यायचे हा पायंडा असतो. त्यामुळे त्या घराण्याचा इतिहास जपणाऱ्या स्त्रिया त्या पक्षातील उमेदवारानाच मत देऊन येतात. मग त्या उमेदवाराचे स्थानिक, संसदीय राजकारण गलथानपणाचे असले तरी चालते.

'भारत–धर्मनिरपेक्ष राष्ट्र' अशी तरतूद राज्यघटनेत आहे. पण राजकारणाला आधारभूत निवडणूक प्रक्रिया घडताना मात्र धर्मनिरपेक्षतेचा पंचनामा पहावयास मिळतो. आपल्या धर्माची, जातीची मते वळवण्यास उमेदवार यशस्वी होतात. स्त्रियांचा मानसिक कल जाती, धर्माकडेच जास्त असतो. त्यामुळे त्या आपल्या जाती, धर्मातील उमेदवारालाच मत देतात. बहुतांशी अल्पसंख्यांक जमातीत हे प्रमाण जास्त असते. सारांश बंडखोर वृत्ती स्त्रियांत कमी असल्याने कोणतेही मत परिवर्तनासाठी किंवा विकासासाठी दिले गेले असेलच याची शाश्वती नसते.

भारतातील अजूनही पन्नास ते साठ टक्के स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल व मूल' यापुरतेच मर्यादित आहे. ज्या स्त्रिया या चक्रातून बाहेर आल्या आहेत, त्यांना मतदानाचे महत्व पटले आहे. पण अजूनही ज्यांच्याकडे सनातनी वृत्ती किंवा राजकारणाशी संबंध

नाही त्या स्त्रिया मात्र मतदानाच्या बाबतीत उदासीन आहेत. त्यांना मतदान चुकविणे व मतदान करणे यातील फरक फारसा समजलेला नाही.

स्त्रिया अनुकरणशील असतात. ज्या घरात अजूनही कर्त्या पुरुषाचा दबदबा असतो, त्या घरात त्याच्या मनाप्रमाणेच मते दिली जातात. किंवा काही स्त्रिया घराबाहेरच्या जगाबाबतीत अनभिज्ञ असतात, त्या आपल्या पतीच्या निर्णयावरूनच मत देतात. अशिक्षित असूनही ज्या स्त्रियांना राजकारणाबाबत जाण आहे, स्वतःच्या अस्तित्वाची जाण आहे, त्या पुरुषाच्या वर्चस्वाखाली न येता स्वतंत्रवृत्तीने मतदान करतात. पण अजूनही शिक्षणाचा प्रसार पूर्णपणे झालेला नाही. त्यामुळे स्त्रियांचे स्वतंत्र वृत्तीने मतदान होत नाही. चाळीस वयोगटावरील स्त्री–पुरुषांच्या मतावरच अवलंबून असते किंवा कुटुंबाचे नातेवाईक किंवा मित्रमंडळी ज्या पक्षात असतात, त्या पक्षालाच मते देण्याचा अट्टाहास पुरुष स्त्रियांवर करतात.

काही स्त्रियांना अजूनही राजकारणाबाबतीत आवड नाही; घरात एकूण वातावरणच तसे आहे; पोटांचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही; त्यामुळे बाहेरच्या गोष्टींबाबत आवड नाही. त्यामुळे स्त्रिया अजूनही निवडणूक प्रक्रियेत सहभाग घेत नाहीत. काही काही क्षुल्लक कारणामुळे देखील मतदान चुकविले जाते. म्हणजेच त्यांना अजूनही मतदानाचे महत्व पटलेले नाही किंवा आपल्या एका मतामुळे काय क्रांती घडून येऊ शकते याची त्यांना कल्पना नाही. कोणतेही सरकार आले तरी त्यांच्या कार्याचा परिणाम आपल्या स्वयंपाक घरावर होणार नसतो हे त्यांना माहीत असते. त्यामुळे आपल्या एका मताने फारसे काही बिघडणार नाही असा त्यांचा ग्रह असतो.

स्त्रीकडे सद्सद्विवेकबुद्धीची, सत्प्रवृत्तीची, सज्जनतेची धारणा असते. तिच्याकडे आकलनशक्ती जास्त प्रमाणात असते. पण आपल्या समाजात तिची विचारशक्ती, दूरदृष्टी विचारात घेतली जात नाही, त्यामुळे ती हिरिरिने आपले कोणतेही मत मांडत नाही. 'तुला काय व्यवहारं ज्ञान नाही' या आशयाखाली तिची सर्व मते दडपून टाकली जातात. त्यामुळे तिची विचारशक्ती कुंठित होते. पुढे–पुढे ती स्वतःचे मत बनविण्याबाबत परिपक्व समजली जात नाही. परिणामी पुरुष सांगेल त्या उमेदवारास मत देण्याची वृत्ती बळावते.

या गोष्टींचा अपवाद वगळता, ती जर आपल्या अधिकाराबाबत जागरूक झाली, स्वतंत्र विचार करणारी झाली, आपल्या मताचे मूल्य जाणणारी झाली, आपले मत ठासून मांडणारी, आपले स्थान अढळ करणारी झाली, तर ती नक्कीच लोकशाहीला तारणारी ठरेल. मग उद्याच्या लोकशाहीचा सूर्योदय मान–मर्यादेला प्रमाण करून उगवेल !

यासाठी मतदानाबाबत जी उदासिनता आहे, अशिक्षितपणा आहे, तो लोप पावला पाहिजे. यासाठी शैक्षणिक प्रसारच पूरक ठरू शकेल. शिवाय ज्या सुशिक्षित जाणकार स्त्रिया आहेत, त्यांनी त्यांच्यात राजकारणाची आवड निर्माण केली पाहिजे. निवडणूकांचे, मताचे महत्व समजावून दिले पाहिजे; राजकारणावर, सद्यःस्थितीवर चर्चा घडवून आणली पाहिजे. म्हणजेच स्त्रियांना आपल्या एका मताचे महत्व समजेल. पुरुषांनी देखील स्त्रियांच्यावर आपले मत न लादता त्यांना स्वतंत्र वृत्तीने मतदान करण्याची संधी दिली पाहिजे. स्त्रियांनी घराबाहेरील वातावरणात, चर्चेत रस घेतला पाहिजे. आपल्या शेजारी ज्या सुजाण स्त्रिया असतील त्यांच्याकडून काही गोष्टी जाणून घेतल्या पाहिजेत, त्यात सहभाग घेतला पाहिजे. घाईगडबडीने कोणत्याही उमेदवाराबद्दल पूर्वग्रहदूषित मत बनवू नये. यासाठी स्त्रियांना प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमातून राजकारणाबद्दल व मतदान कसे करावे याबाबत माहिती उपलब्ध करून दिली. पाहिजे.

स्त्री संघटनातील स्त्रिया ह्या जागृत व सुशिक्षित असतात. पण अशा स्त्री संघटनांचा खेड्याच्या ठिकाणी अभाव असतो. शहरातील स्त्री–संघटना या परंपरावादी राष्ट्रवादी संघटनांच्या उपशाखा म्हणून अस्तित्वात असतात. अजूनही स्वतंत्र स्त्री संघटना अस्तित्वात नाही. स्वतंत्र स्त्री संघटना अस्तित्वात आल्या तर त्याची मदत खेड्यातील स्त्रियांना मिळेल त्यामुळे स्त्रिया सुधारणावादी व निःपक्षपाती दृष्टीने मतदान करतील.

वरील गोष्टी शक्य झाल्या तरच लोकशाहीला तारण्याचे काम सुशिक्षित, स्वतंत्र, विचारी, संघटीत महिला करू शकतील. त्यांच्या सक्रिय सहभागाने लोकशाहीला नवीन दिशा मिळेल. येणारी लोकशाही नक्कीच भ्रष्टाचार विरहित पवित्र आणि शुद्ध असू शकेल. यासाठी स्त्रियांचा राजकारण व मतदान या विषयीचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

# डॉ. आंबेडकर परिवर्तनवाद आणि आजची स्थिती

– शेखर वसंतराव जोशी
बी. ए. भाग १

संपूर्ण भारतात जी परिवर्तनाची चळवळ झाली त्यातून अनेक वाद निर्माण झाले. डॉ. आंबेडकरांची यातील भूमिका ही महत्वाची होती. पण त्यांची राखीव मतदार संघाची मागणी ही चुकीची आहे हे लक्षात येताच त्यानी मोठ्या मनानं म. गांधींचा सल्ला मानला आणि राष्ट्रहितालाही महत्व दिले. पण आज परिस्थिती इतकी विकट आहे की प्रत्येकाने आपले नेते जाती तत्वावर वाटून घेतलेत आणि परत नवे वाद निर्माण होऊ लागलेत. आम्ही सर्वजणच याला जबाबदार आहोत. सर्वांनीच आंबेडकरांच्या सारख्या नेत्याना केवळ दलितांचे नेते म्हणून संकुचीत करून ठेवलंय. काय आंबेडकर फक्त दलितांचेच नेते होते? केवळ घटनेचा मसुदा लिहीण्या व्यतिरिक्त त्यांनी इतर काही केलं नाही काय? काय त्यांना दलित–दलितेतर अशा प्रकारचा वाद माजवून वेगळं 'स्थान' हवं होतं? या साऱ्या प्रश्नांची उकल करण्यासाठी मी हा लेख लिहायचा निश्चय केला.

"मी हिंदू म्हणून जन्मलो असेन पण हिंदू म्हणून मरणार मात्र नाही" अशी बाबासाहेबांनी घोषणा केली होती. तिचा उल्लेख करून राजकीय क्षेत्रात काम करणारी काही विघ्नसंतोषी मंडळी दलित–दलितेतर संबंध बिघडवण्याचा प्रयत्न करीत असतात. बाबासाहेब असे जरी बोलले असले तरी त्यांच्या कार्याचा सूक्ष्म अभ्यास केल्यास त्यांचे हिंदूत्वाशी असणारे नाते अतूट होते हे दिसून येईल. फक्त त्यावेळचा समाज त्यांना ओळखू शकला नाही. कारण त्यांना जी दूरदृष्टी लाभली होती, ती जन्माधिष्टीत समाजरचनेत अडकलेल्या हिंदू समाजाला समजणे अशक्य होते. पण आज तरी काय अवस्था आहे. आपण २१ व्या शतकात जाण्याच्या गप्पा मारत असलो तरी आमची अवस्था तिच आहे. बाबासाहेबांचे विचार बाजूलाच राहिले आहेत. त्यांचे विचार स्वच्छ असताना देखील त्यांच्या विचारांचा चूकीचा अर्थ लावला जात आहे आणि आपला स्वार्थ साधण्यात काही मंडळी गुंतली आहेत.

समुद्र मंथनातून निघालेले हलाहल भगवान शंकरानी प्राशन केले. आधुनिक काळात जन्माधिष्टीत समाजरचनेचे अत्याचाराचे हलाहल बाबासाहेबांनी पचवले व हिंदुस्थानची पुढील विघटनाची प्रक्रिया थांबवली. का? याचे एकच उत्तर त्यांचं या हिंदुस्थानवर प्रेम होतं. नाहीतर बॅ. जिनाप्रमाणं त्यांनीही एखादे स्थान मागीतले असते. पण त्यांना संपूर्ण समाज एक करायचा होता. जन्माधिष्ठीत समाजरचना मोडून काढायची होती. समाजहिता इतकेच त्यांनी राष्ट्रहितासही महत्व दिले. आज जी काही परिस्थिती निर्माण झाली आहे ती बाबासाहेबांना अभिप्रेत होती काय? आज जी सूडाची विघटनाची भाषा बोलली जाते ती त्यांना मुळीच अभिप्रेत नव्हती. म्हणुन तर त्यांनी सूड, द्वेष, कलह यांच्या पलिकडे नेणाऱ्या बौद्ध तत्वज्ञानाचा स्वीकार केला. तलवारीच्या जोरावर आणि पैशाच्या जोरावर धर्म वाढविणाऱ्यांचा धर्म त्यांनी स्वीकारला नाही.

तत्पूर्वी बाबासाहेबांनी हिंदू धर्मात समान स्थान मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. १९२७ साली त्यांनी महाड येथील चवदार तळयातील पाणी अस्पृश्यांना मिळण्यासाठी प्रयत्न केला. १९३० ला त्यांनी आपल्या अनुयायांसह नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी प्रयत्न केला, पण दुर्दैव असे की त्यांना त्यावेळच्या समाजाकडून विरोध झाला. परिवर्तन नको म्हणणाऱ्यांना मुळीच दूरदृष्टी नव्हती. कारण तेव्हा बाबासाहेबांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न झाला असता तर आज परिस्थिती इतकी वाईट झाली नसती.



Scanned with CamScanner

त्यावेळी बाबासाहेबांचा अखेर नाईलाज झाला. सहनशिलतेला देखील मर्यादा असतात आणि अखेर बाबासाहेबांची सहनशिलता संपली. त्यांनी १९३५साली धर्मांतराची घोषणा केली.

डॉ. आंबेडकरांचा सर्व धर्मांचा अभ्यास हा सखोल होता. पण आपण कोणता धर्म स्विकारावा हा निर्णय होत नव्हता. मन गोंधळून गेले होते. या विवंचनेतुन सुटण्यासाठी त्यांना पाश्चिमात्य किंवा भारतीय विद्वानांची निवड करता आली असती, पण त्यांनी या समस्येतुन मार्ग काढण्यासाठी एका भारतीय संताची निवड केली. हातात एक फुटकं मडकं घेऊन 'देव की नंदन गोपाला' चा जयघोष करत हिंडणाऱ्या एका बैराग्याची निवड करावी ! पण वरवर बैरागी वाटणारे गाडगे महाराज समाजाला चांगलं वाईट याची फारखत करायचा उपदेश करत होते. डॉ. आंबेडकरांनी त्यांची विद्वत्ता ओळखली होती आणि अखेर बाबासाहेब या मातीत जन्मले होते. या इथल्या मातीशी, या हिंदू भूमीशी त्यांचं रक्ताचं नातं होतं. म्हणूनच त्यांनी संत गाडगेबाबांचा सल्ला घ्यायचं ठरवलं. त्यांनी संत गाडगेबाबांना आपली गोंधळलेली परिस्थिती सांगितली व कोणत्या धर्माचा स्वीकार करू असे विचारले. अर्थातच गाडगे महाराजांनी सांगून टाकलं, "मी तर अडाणी धोबी, मला काय धर्माचं ज्ञान असणार." ते टाळाटाळ करू लागले. पण बाबासाहेबांनी आग्रह धरल्यावर अपेक्षित असाच सल्ला दिला. 'ख्रिश्चन बनू नका, त्याने आपल्या देशाला धोका आहे व मुसलमान बनु नका, त्यात नाशच आहे.' इतके सांगून बाकीचा निर्णय त्यांनी बाबासाहेबांच्यावर सोपवला. ही भेट अतिशय महत्वाची ठरली होती. कारण बाबासाहेबांच्या पाठीशी असणाऱ्या साऱ्या दलित समाजाचं या निर्णयावर भवितव्य अवलंबून होतं. बाबासाहेबानी या भारत भूमिशी नातं सांगणाऱ्या या भूमितच जन्मलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

पण धर्म बदलून समस्या मिटत नसतात हे ही तितकंच आज सत्य ठरलं आहे. पण बाबासाहेबांचा आज नाईलाज झाला होता. 'मी इतका शिकलो ज्ञानी झालो तरी माझा हे स्वीकार करत नाहीत, मग माझ्या पाठीशी जो अशिक्षित अज्ञानी समाज आहे त्याचं काय? या प्रश्नानेच त्यांना अखेर या निर्णयाप्रत यावं लागलं. पण तत्पूर्वी त्यांनी हिंदू धर्मातील वेदांचा, उपनिषदांचा सखोल अभ्यास केला होता आणि संशोधनात्मक असं एक पुस्तकही लिहलं, 'शूद्र पूर्वी कोण होते' (Who were the Shudra's) हे त्याचं नाव. या पुस्तकात त्यांनी चौथा शूद्र हा वर्णच नव्हता असे मत मांडले आहे. ही मते व त्यासाठी वेदातील जागोजागी दिलेले पुरावे पाहता त्यांच्या विद्वत्तेची जाणकारांना कल्पना येते. चौथा वर्ण नव्हताच असे त्यांनी याच पुस्तकातील आठव्या प्रकरणात सिद्ध केले आहे. त्यासाठी त्यांनी ऋग्वेद, शतपथ ब्राह्मण व तैतरिय ब्राह्मण इत्यादी संदर्भ व दाखले दिले आहेत. या त्याच्या पुस्तकातील तर्क हे सुसंगत आहेत, कारण त्याना पुराव्याची बैठक आहे. तत्पूर्वी या बाबतीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदेनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' नावाचे संशोधनपर पुस्तक लिहले. अस्पृश्यता निर्माण होण्याची जी कारणे शिंदेनी सांगितली आहेत, त्यातील कित्येक मताशी डॉ. आंबेडकर सहमत असल्याचं दिसतं. या सर्वावरुन त्यांचा वैदिक साहित्याचा अभ्यास किती सखोल होता याची प्रचिती 'शूद्र पूर्वी कोण होते' या पुस्तकात त्यांनी अनेक पाश्चात्य व पौर्वात्य विचारवंतांची मते व पुरावे देऊन मुळ मानव वंशाची एकच भाषा असावी अर्थात ती सस्कृत, पाश्चात्यांच्या मते इंडोयुरोपियन म्हणजे संस्कृतच होती असे आता सिद्ध झाले आहे.

मला वाटते इतका डॉ. आंबेडकरांनी जो हिंदू धर्माचा अभ्यास केला व या महान धर्मात विषमता नाही ती घुसडली आहे असे सिद्ध केले ते कशासाठी ? तर आपल्या धर्मावर व संस्कृतीवर मनापासून प्रेम होतं म्हणुनच अखेरपर्यंत त्यांनी हिंदू धर्मात राहून समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण सारे काही व्यर्थ ठरले. पण आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्विकारल्यामुळे वाद निर्माण झाला पण असा वाद करण्याची काहीच गरज नाही. कारण गौतमबुद्धही या हिंदू भूमितच जन्मले आणि या संस्कृतीचा आदर करणारेच धर्म-तत्वज्ञान त्यांनी सांगितले. असा हिंदू आणि बौद्ध असा भेद करण्याची आज काहीही गरज नाही. दोन्ही धर्म या पवित्र भूमितीलच आहेत हे विसरून चालणार नाही. आता राहता राहीला परिवर्तनाचा वाद.



Scanned with CamScanner

खरं तर जो धर्म लवचिक आहे म्हणजे काळानुसार बदल स्विकारणारा आहे तोच काळाशी सामना करू शकतो. नाही तर मुस्लीम धर्म अतिशय ताठर आहे. त्या धर्मातील महमद पैगंबरांनी असं म्हंटलं आहे की 'मी शेवटचा पैगंबर आहे'. त्याप्रमाणे आपल्याकडे म्हणजे हिंदू धर्मात असं कोणी म्हटलेलं नाही. उलट जेव्हा धर्माला ग्लानी येते तेव्हा मी पुन्हा अवतार घेतो असं श्रीकृष्ण (गीतेत) म्हणतात. हिंदू धर्मात वैदिक कालापासून परिवर्तने होत आली आहेत, याचे अनेक पुरावे मिळतात. धर्मातील शाश्वत भाग कोणता आणि परिवर्तनीय भाग कोणता हा विचार करून योग्य परिवर्तने पूर्वी झाली असली पाहिजेत. आपल्या देवतामध्येही परिवर्तन झालेले दिसते, पूर्वी इंद्र, वरुण, अग्नी या देवतांची पूजा होत होती. तर आज विष्णू, शिव आदिंची पूजा, उपासना चालू आहे. आद्य शंकराचार्यांनी देखील काही परिवर्तने केलेली आढळतात एकेकाळी शैव आणि वैष्णव यांच्यामधून विस्तव जात नव्हता. पण शंकराचार्यांनी त्यांच्यात समन्वय साधला. म्हणजेच परिवर्तने ही पूर्वीपासून कालानुरुप होत आली आहेत. जन्माधिष्टीत समाज रचनाही नव्हती याला देखील पुरावे सापडतात. " शूद्रोपी शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणोभवेत् ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात प्रत्यावरो भवेत् " अशी वचने जुन्या ग्रंथांत सापडतात. 'चांगल्या आचरणाने शूद्र देखील ब्राह्मण होऊ शकतो व वाईट आचरणामुळे ब्राह्मण देखील शूद्र होऊ शकतो' हाच त्याचा अर्थ. जन्माने ब्राह्मण होतो असे नाही. कारण ऋष्यश्रृंग, वसिष्ठ, विश्वामित्र, अगस्ति हे काही जन्मत: ब्राह्मण नव्हते. त्यांच्या चांगल्या आचरणाने व तपश्चर्येमुळे ते ब्राह्मण झाले. हे सांगायचं कारण इतकंच की परिवर्तनाला जे कोणी विरोध करत ते योग्य नाही.

सुदैवानें आपल्या धर्माचे कालानुसार परिवर्तन घडुन आले. त्यामुळे सर्वात प्राचीन अशी ही धर्म संस्कृती टिकून आहे. पण मध्ययुगाच्या कालावधी परिवर्तन होणे बंद होऊन वाहते पाणी साचले, परंपरांचे व रुढींचे घाणेरडे डबके झाले. पण हेच पा ऊगाळत बसलो तर जुन्या पीढीने ज्या चुका केल्या त्याच आपल्या हातून घडू नयेत एवढेच सांगावे वाटते.

कारण आज जी स्थिती निर्माण झाली आहे ती फारशी चागली आहे असे म्हणता येणार नाही. आज ही जातीयवाद तितकाच बोकळला आहे. डॉ. आंबेडकरांनी ज्या प्रकारे दलित संघटन करून आदर्श घालून दिला तो आदर्श आज मात्र राहिलेला नाही. दलित नेंत्याच्यातच गट पडले आहेत. काहींच्याकडून दलित-स्थानची मागणी होते. तर सवलतीना आणखी दहा वर्षे वाढ मिळाल्यामुळे परत जातीय दंगली उसळतात हे कुठंतरी थांबलं पाहिजे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असनाना आपण सर्व जातीव्यवस्थेच्या शृखंलातून सुटू शकत नाही. ह्याच्या एवढे दुर्भाग्य ते कोणते आज आपण जातीच्या तत्वावर सुधारकाही वाटून घेतले आहेत. या सर्व सुधारकांचे विचार थोडे भिन्न असले व कार्य करण्याची पध्दती वेगळी असली तरी ध्येय एकच होते. ते म्हणजे महान भारताच, वैभवशाली भारताचं स्वप्न या प्रत्येकाच होत आणि ते साकार करण्याची जबाबदारो आम्हा सर्वांची आहे. आणि हे आपल पवित्र कर्तव्य आहे.

## विचारधारा

हरीण कितीही वेगाने धावले तरी वायू वेगाने धावणाऱ्या पारध्याच्या बाणाला बळी पडते, तद्वतच माणूस कितीही मोठा व विद्वान असला तरी त्याला कोठे ना कुठेतरी कलंक लागलेला असतो.

संकलन – नामदेव पाटील
बी. ए. भाग २

# हायड्रोजन टुडे

– दिग्वीजय भाट
बी. एस्. सी. ३

'हायड्रोजन टुडे' या शीर्षकाखाली मॉस्को येथे अलिकडेच एक जागतिक परिषद झाली. हायड्रोजनवर अधिष्ठित उर्जा अभियांत्रिकी हा तिचा विषय होता. भारतासहित अनेक देशातील ५०० शास्त्रज्ञ या परिषदेला उपस्थित होते. आपले प्रतिनिधी व्ही. गोकिन या परिषदेला उपस्थित होते.

हायड्रोजन हे अत्यंत हलके व जीवपरिसर दृष्टया अत्यंत हलके व शुद्ध असे मूलतत्व आहे.

हायड्रोजनजवळ सर्वोच्य दाहक शक्ती असेल पण त्याचबरोबर त्याची दुसरी बाजू आहे; हायड्रोजन अत्यंत स्फोटक असतो, त्यामुळे मोटारगाड्यांच्या इंधनासाठी त्याचा वापर करण्यावर बंधन येते.

खेदाची गोष्ट म्हणजे मोटार–गाड्यांसाठी हायड्रोजनचा वापर करणे केवळ स्वप्नच राहिले असून अग्निबाणाच्या इंजिनसाठी त्याचा वापर ही वास्तवता ठरली आहे. १०० टन वजनासहित अंतराळात जाणाऱ्या 'एर्मजिया' या अग्निबाणाच्या इंजिनसाठी द्रवरुप हायड्रोजन व ऑक्सिजन वापरला जातो त्यातून निर्माण होणारा एकमेव पदार्थ म्हणजे पाण्याची वाफ.

हायड्रोजन विमानोड्डाण – युगाची सुरूवात सोविएत टीयू १५५ जेट विमानांनी केली होती. विमानाच्या मागे अनेक किलोमीटर पर्यंत राहणारा नेहमीचा वायूचा पट्टा कोणालाही दिसला नाही. उलट हायड्रोजन इंधनाच्या उच्च दाहक शक्तीमुळे अशा प्रकारच्या विमानांची उड्डाण शक्ती पारंपरिक विमानापेक्षा दुप्पट असेल.

या परिषदेत विमान आरेखनकार अलेक्सी तुपोवेल यांनी पत्रकारांना आपल्या टीयू २०४ या नव्या विमानाविषयी माहिती दिली. या विमानाचे पहिले उड्डाण या वर्षीच होईल. या विमानात इंधन म्हणून घासलेट वापरण्यात येईल. पण द्रवरुप हायड्रोजन वापरता येईल अशा प्रकारे त्याच्या इजिनाचे आरेखन करण्याचे काम सुरू आहे.

अलेक्सी तुपोवेल यांनी हायड्रोजनवर अधिष्ठित विमानांच्या इंजिनांच्या उच्च जीवपरिसरविषयक क्षमतेवर भर देऊन सांगितले कि, हायड्रोजनचे उत्पादन ही आज एक अवघड बाब असलेने प्रवाशांना घेऊन जाण्यासाठी अशा प्रकारची विमाने खर्चिक आहे.

हायड्रोजन उत्पादन व त्याचा वापर या क्षेत्रातील सोविएत व भारतीय शास्त्रज्ञामधील प्रश्नाचे उत्तर म्हणजे औष्णिक रासायनिक प्रक्रियाद्वारे पाण्यापासून हायड्रोजन मिळविणे. सौरशक्ती, वारा किंवा समुद्राच्या लाटा वापर करून विद्युत–विच्छेदनाद्वारे हायड्रोजनचे उत्पादन करण्याचा अभ्यास करणे शक्य आहे. आणखी एक शक्यता आहे, ती म्हणजे हायड्रोजन व काही धातू यांच्या परस्पर क्रियेच्या संयुक्त अभ्यासाची; धातू जेव्हा हायड्रोजन शोषून घेतो, त्यावेळी त्याचे रुपांतर जलजनक धातूमध्ये होते. अशा जलजनक धातूने औष्णिक ऊर्जा शोषून घेतल्यास आपण ती ऊर्जा कितीही अंतरापर्यंत वाहून नेऊ शकतो. इतकेच नव्हे तर अशी ऊर्जा शंभर वर्षापर्यंत जतन करू शकतो. आपल्याला पाहिजे असेल त्यावेळी ती ऊर्जा आपण वापरु शकतो. हायड्रोजन हा एक उत्तम ऊर्जावाहक आहे.

अंतराळ–संशोधकांच्या आशा ज्यावर खिळलेल्या आहेत त्या 'एर्नजिया' अग्निबाणात आणि विमानात इंधन म्हणून हायड्रोजन वापरला जातो. ही एक आश्चर्यकारक यश:सिद्धी आहे.



Scanned with CamScanner

# निष्काम कर्मयोग

– शिवराम त्रिवंबर कुलकर्णी
बी. एस्‌. सी.

भगवद्गीतेतील साधनांची सुरूवात कर्मापासुन होते. पाश्चात्य तत्वज्ञानाशी भारतीय तत्वज्ञानाची तुलना केली असता भारतीय तत्वज्ञानाचे जे विशेष दृष्टीस पडतात त्यापैकी एक महत्वाचा विशेष म्हणजे भारतीयांची कर्माची कल्पना. अगदी बौद्धदर्शने सुद्धा कर्माची कल्पना व पुनरपि जननं, पुनरपि मरणं ची कल्पना मान्य करतात.

ज्ञानेश्वरीमध्ये निष्काम कर्मयोगाला ज्ञानयोगा इतकेच स्थान प्राप्त झाले आहे. पूर्व–पश्चिम वाहणाऱ्या नद्या वाहताना वेगवेगळया असतात पण समुद्रात मिळताना त्या समुद्ररुपच होतात. त्याप्रमाणे ज्ञानयोग व कर्मयोग ह्या एका नाण्याच्या दोन बाजु आहेत. कर्मयोग व ज्ञानयोग यात सकृतदर्शनी फरक दिसत असला तरी त्याच्या ध्येयात कोणताच फरक नाही. ज्ञानेश्वरीमध्ये याचे वर्णन मार्मिकतेने केले आहे एखादा पक्षी झाडावरील फळ काही सेकंदात संपादित करतो. पण मनुष्यप्राण्याला ते फळ मिळविण्यासाठी फांद्यामागुन फांद्या पालथ्या घालाव्या लागतात. पण दोन्हीचे फळ मिळविणे हे ध्येय मात्र एक आहें. म्हणून अंत:करण शुद्धी, ब्रह्मज्ञान, मोक्ष इत्यादी साध्ये कर्म मार्गाने सुद्धा साध्य करता येतात.

काहीजण अध्यात्माला नैष्कर्म्य समजतात. पण भगवद्गीतेतुन नैष्कर्म्य कर्मयोगापेक्षा निष्काम कर्मयोग प्रतिपादित केला आहे, एवढेच नव्हे तर नैष्कर्म्यवाद्यांची टिंगल उडविली आहे. ज्ञानेश्वर स्पष्टच म्हणतात,

कि प्राप्तकर्म सांडिजे । येतुलेनि नैष्कर्म होइजे ।
हे अर्जुना वाया बोलिजे । मुर्खपणे ॥

जर आपल्याला नदीच्या पैलतीराला पोहोचायचे असेल तर आपण होडीचा त्याग का करावा ? किंवा भोजनाची इच्छा असताना स्वयंपाक न करता कसे चालेल ? म्हणुन आपण कितीही कर्मत्यागाची भाषा केली तरी कर्माचा त्याग कदापि होणार नाही. इंद्रियावरती कितीही बंधने घातली तरी मनाने संकल्प विकल्प करणे किंवा भुक तहान थांबणार नाही. ज्याप्रमाणे आपण आगगाडीतून प्रवास करीत असताना स्वत: चालत नाही असे वाटते. पण आपण प्रवास करीत पुढे पुढे सरकत असतोच त्याप्रमाणे आत्म्याचा शरीराचा, मायेचा संबंध आहे तोपर्यंत कर्माचा त्याग घडणे कधीही शक्य नाही.

कर्मत्याग अशक्य आहे हे सिद्ध झाल्यानंतर कर्मयोग कोणत्या प्रकारे आचरावा हा प्रश्न पडतो. भगवद्गीतेत निष्काम कर्मयोग सांगितला आहे आणि हाच मार्ग आज अवलंबायला हवा. हा कर्मयोग आचरण्यास फारच सोपा आहे आणि आजकालच्या जीवन विषयक घडामोडी पाहता निष्काम कर्मयोगाला पर्याय नाही असेच वाटते.

निष्काम कर्मयोगातील पहिली पायरी म्हणजे स्वधर्माचरण. स्वधर्माचरण हाच आपला नित्य धर्म आहे. जे लोक स्वत:चे कर्तव्य विसरतात त्यांची साहजिकच कुकर्माकडे प्रवृत्ती होऊन ते अनर्थास प्राप्त होतात. ज्ञानेश्वर म्हणतात,

म्हणोनि जे जें उचित । आणि अवसरे करूनी प्राप्त ।
ते कर्म हेतुरहित । आचरे तु ॥

भगवद्गीतेत वेगवेगळया उपासनांचा विचार केला आहे. पण सर्व उपासनांचे साध्य विहित कर्माच्या आचरणातूनच होणार आहे. उपासनेकरिता कर्म टाकणेची आवश्यकता नाही. उलट कर्म करूनच प्रसाद मिळविता येतो. फक्त हे कर्म ईश्वरार्पण बुद्धीने करावे. ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करणे म्हणजे कर्मफलाची आशा न धरणें. थोडक्यात कार्याच्या परिणामात विशेष घोळ न घालता जे कार्य हाती घेतले आहे ते जास्तीत जास्त

रित्या तडीस नेणे हा एकच उद्देश ठेवावा. या निष्काम कर्मयोगाची तुलना जर आजच्या रोजच्या जीवनाशी केली तर याला किती महत्वाचे स्थान आहे हे दिसून येईल कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न ठेवणे, भोवतालची सर्व माणसे सुखी होतील. कमीत कमी आपला त्यांना कोणताही त्रास होऊ नये, अशा प्रकारच्या भावना या कर्मयोगातून प्रतिपादित होतात. विहित मार्गानी जी संपत्ती मिळविली ती भोगसाधन न समजता हवनद्रव्य समजुन ईश्वराला अर्पण करून बाकी उरलेले प्रसाद म्हणून सेवन करावा या निष्काम कर्मयोगातील कल्पनेमागे उदात्त विश्वबंधुत्व, निःस्वार्थी बुद्धी, सामाजिक बांधिलकीच सामावली आहे. या ठिकाणी ईश्वराची कल्पना ही आजच्या काळातील जनता-जनार्दनाशी केली तर या कर्मयोगाचे महत्व समजुन येईल, अगदी उपनिषदाचा आदेशच आहे, मातृदेवो भव। पितृदेवो भव। अतिथीदेवो भव। कुशलान मा प्रपद। सत्यम् वद। धर्मम् चर।

स्वधर्माचा त्याग केला तर पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी आपली अवस्था होईल. म्हणून सर्वांनी आपले विहित, उचित कर्म आचरण्याविषयी तत्पर असावे. जर आपण आपले स्वधर्माचरण केले नाही तर आपल्या जीवनाला काहीच अर्थ राहणार नाही. ज्ञानेश्वरीत शेळीच्या गळयातील स्तनाचे उदाहरण यास मार्मिकतेने दिले आहे.

का गला स्तन अजेचे। तैसे जियाले देखें तयाचे।
जया अनुष्ठान स्वधर्मांचे। घडेचिना॥

कर्मयोगाची व्याप्ती गीतेने असाधारण व्यक्ती-पर्यंत सुद्धा वाढविली आहे. प्राप्त पुरुषाचे उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर त्याला काही कर्म उरत नाही ही कल्पना गीतेने पर्यायाने ज्ञानेश्वरीने खोडुन काढली आहे.

देखें प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले।
तयाही कर्तव्य असे उरले। लोकांलागी॥

जर या प्राप्तार्थ लोकांनी कर्माचरण केले तर ते अज्ञानी लोकांना मार्गदर्शनच ठरेल. या वडिलधाऱ्या मंडळीमुळे अज्ञानी लोकांना कसे वागावे हे कळेल. त्यांच्या राहणीला वळण लागेल व जे अज्ञानाने भ्रष्ट होणार आहेत, त्यांच्यावरचा अप्रसंग अनायास दूर होईल. ज्याप्रमाणे आईला बालकाच्या चालीबरोबरच पाऊल टाकावे लागते किंवा आंधळयाला नेताना त्याला योग्य प्रकारेच चालावे लागते, त्याप्रमाणे ज्ञानी लोकांनी आपले जें कर्म आहे ते न टाकता इतरासाठी करावे असा गीतेचा आदेश आहे. या आदेशाचे पालन जर आजचे बुद्धीवंत करतील तर निष्काम कर्मयोगाचे किती महत्वाचे स्थान आहे हे समजुन येईल. थोडक्यात ब्रह्मत्वाला पावल्यानंतर कर्म टाकून स्वस्थ बसणे ही गीतेची अंतीम ध्येयस्थिती नव्हे.

निष्काम कर्मयोगात कर्म करण्याच्या ज्या पद्धती सांगितल्या आहेत त्यास तोड नाही. आपण जे कर्म करतो ते योग्य हवे व त्याला दिशाही योग्य हवी. अतिशय मधुर आंबा आहे म्हणुन एकदम तोंडात घातला तर तो बुचासारखा तोंडात बसेल. त्याप्रमाणे कर्मात घिसाडघाई दाखवून चालणार नाही. आता जर आंबा खाल्लाच नाही तर रसस्वादाला मुकावे लागेल. म्हणुन गीतेत मी कर्म कर्ता ही अहंता व कर्मापासुन उत्पन्न होणारे फळ मला प्राप्त व्हावे ही इच्छा कर्मातील बाधकता समजली आहे.

गीतेतील कर्म करण्याची हातवडी वर्णन करताना राधाकृष्णन् लिहितात, Gita preaches not renunciation of karma but renunciation in karma कर्माच्या जंजाळाला कंटाळुन ज्याने कर्म टाकले तो भित्रा. कर्तृत्वाचा अभिमान न ठेवता आपले कर्म करणे किंवा कर्मफलाची अपेक्षा न करता, मी कर्ता हा अहंकार सोडून कर्म करणे म्हणजेच निष्कामपना. ज्ञानेश्वरीत जो दाता दान करून सुद्धा दातेपणाचा अभिमान बाळगत नाही किंवा फळाची इच्छा न करता वृक्षवेलींची जोपासना करतो तोच खरा कर्मयोगी समजला आहे.

गीतेच्या दृष्टीने थोर जो की कर्म करतो पण कर्मफलात इच्छा ठेवत नाही मनुष्याला निष्काम बुद्धीने कर्तव्य स्वतःकडे न घेता कर्म करता येते हेच ज्ञानेश्वरीत स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वरांनी सर्वांना एक निरोपच दिला आहे.

म्हणौनि फळी त्यागु। सांडोनि देहसंगु।
कर्मे करावी हा चांगु। निरोपु माझा॥



Scanned with CamScanner

# अनाथ

– भूपाल रामचंद्र दिवेक

बी. ए. भाग

नोकरानं पत्र हातात दिलं. पत्रावरचं नाव वाचून डॉ. माळींची उत्सुकता साहजिकच ताणली गेली. तो लिफाफा त्यांनी टर्रकन् फाडला आणि वाचायला सुरवात केली. त्यात एवढंच लिहिलं होतं– 'ना आई, ना बाप – केवळ अनाथ. अशांना आपल्या बायकोवर तरी माया करायची कशी कळणार? मला सोडचिठ्ठी हवी आहे...'

पत्र वाचून संपलं आणि डॉ. माळींनी आपली मान खुर्चीत तशीच रेलाऊन दिली. अंगातली सारी ताकद जमिनीनं सरसर शोषून घेतल्याचा त्यांना भास झाला. गेला महिनाभर त्यांना असंच अस्वस्थ वाटत होतं. पेशंट करायलाही जमायचे नाहीत. लगेच थकायला व्हायचं. मनात नेहमी एकच विचार, 'ती माहेरी का निघून गेली आणि माझं चुकलं तरी काय?' विचार करूनही त्यांना उत्तर मिळत नव्हतं. मिळत होती केवळ अस्वस्थता...

त्यांनी आयुष्य काढलं ते एक अनाथ म्हणून. पावलो पावली त्याना ह्या शब्दाच्या डागण्या मिळत होत्या. मन पेटून उठायचं. पण पेटून पेटणार तरी किती? जळून जळून थंडगार व्हायचं. समाजाच्या संगिणीला टकरा देत देत बालपण सरलं. लग्न झालं. वाटलं, आता अनाथपण संपलं. पण नाही, तो केवळ एक भास होता. हळूहळू पत्नीचा तिरसट स्वभाव वाढायला लागला. आपल्या अनाथ पतिबद्दल तिला कमीपणा वाटायला लागला. तिच्या अशा छळवादी स्वभावानं ते बेजार झाले. महिना झाला, ती निघून गेली होती आज तिच पत्र आलं. फोडताना डॉक्टरांना वाटलं, तिनं आपल्या चुकीची कबूली दिली असेल. क्षमा मागितली असेल... पण स्वत:च्या पत्नीनंही अनाथ नावाचा विस्तव त्यांच्या काळजावर ठेवला होता.

त्यांचं काळीज पेटून उठलं. अंगाला दरदरुन घाम सुटला. पण तो घाम पुसून बंद होणारा नव्हता. 'ज्या पत्नीत आईचं प्रेम मिळवण्याचा प्रयत्न करत हो तिनंच अनाथ म्हणावं? प्रत्यक्ष आई बापा लाथाडणारं जग आई बाप नसलेल्याना का लाथाडतं त्यांना कोणता नैतिक अधिकार आहे?' उठले. कपडे केले. गाडी बाहेर काढली आणि पेटत्या मना पळवायला लागले. पंधरा मिनिटातच गाडी एका जुना इमारतीसमोर चर्–चक् आवाज करीत थांबली. मोठ्या अक्षरातला 'श्रीमती येसूबाई अनाथाश्रम नावाचा बोर्ड कित्येक वर्षाच्या आठवणींचे कड सोस तग धरून होता. त्या जराजर्जर झालेल्या फलकाच उडालेल्या रंगात डॉ. माळींनाही आपली कहाणी दिसलं ह्याच अनाथाश्रमाच्या भिंतीनी त्यांना आसरा दि होता. कधी सुमारे तीस वर्षापूर्वी एक अर्भक इथं आ होतं आणि तोच लुकलुकणारा मुठीएवढा जीव ए अर्थपूर्ण मानव इथंच बनला होता. स्वत:च्या हुषारी आणि सरकारच्या मदतीनं आज तो एक प्रतिष्ठीत डॉक्टर बनला होता. समोर सारी सुखं आता हात जोडून उभी होती पण अनाथपणाचा कलंक मात्र पुसला जात नव्हता...

"अरे! ये, ये सतीश" बाबाजींच्या स्वागतानं डॉक्टरांची विचारमालिका तुटली. डॉक्टरनी वाकून बाबाजीच्या पायावर डोकं ठेवलं. "सुखी रहा बाळ" म्हणून बाबाजींनी हात उंचावले. बाबाजी म्हणजे चंदनासारखा माणूस. जगानं टाकलेल्यासाठी मायेचं आभाळ बनून नुसतं झिजत राहिला. पाहिल्याबरोबर एखाद्या पवित्र साधूची आठवण व्हावी. लांबसडक पांढरी शुभ्र दाढी, तसाच पेहराव आणि तसलंच चारित्र्य. आयुष्यभर अविवाहित राहिला. अनाथांचा नाथ बनला आणि परमेश्वर गवसल्याच्या आनंदात अनाथ बालकांची सेवा करत राहिला.

"ये... बैस ना इथं" डॉक्टर यंत्रवत खुर्चीवर विसावले. "अरे पण अशी अध्येमध्येच म्हाताऱ्याची

बरी आठवण झाली ?" बाबाजी हसून म्हणाले, "तू तर नेहमी तीस तारखेलाच येतोस ना देणगी द्यायला?"

"होय, बाबाजी... पण काम होतं थोडं आपल्याकडं म्हणून..." डॉक्टरांचे गंभीर थोडे बालिश उद्‌गार ऐकून बाबाजी मनसोक्त हसले. म्हणाले, "अरे बोल ना... ह्या सांगाड्याला आणि कुठं जुंपणार तू?"

"पण आपण ते कराल ?"

"हे तुझं विचारणं झालं कारे बाबाजीला ?"

"मला वचन हवंय !" आता मात्र बाबाजींना काहीतरी गंभीर बाब असल्यासारखं वाटलं. क्षणात ते ही गंभीर झाले आणि चमकून उद्‌गारले, "वचन?"

"होय बाबाजी, वचन !"

"दिलं..."

"बाबाजी मला पत्ता हवाय."

"पत्ता ? कुणाचा ?"

"माझ्या आईचा !" डॉक्टर एखाद्या तिरासारखे बोलले. बाबाजींचा चेहरा गर्रकन् वळला. घटकेत ते खुर्चीवरून बाजूला झाले.

"ते... नाही... ते शक्य नाही बाळ."

"असं करू नका बाबाजी, आपण मला वचन दिलाय."

"...असेल, पण वचन तोडण्यापेक्षा पाळण्यातच मला अधिक पाप लागेल..."

"पाप ? कसलं पाप ? आई आणि मुलाची भेट घडवण्यात कसलं पाप घडणार आहे तुमच्या हातून?"

"घडू शकेल..." डॉक्टरांजवळ येऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरवत बाबाजी म्हणाले, "हे बघ सतीशा तुझ्या भावना का मी जाणू शकत नाही ? पण जरा विचार कर. दोन रस्ते एकमेकापासून दुरावलेत ते तसेच रहावेत आणि त्यातच तुमचं भलं आहे."

"भलं ? आमचं ? ते कसं काय ?"

"अरे, तू आता डॉक्टर झालास, लग्न केलास. आईच्या आशीर्वादानं सारं मार्गी लागलंय तुझं. पण आता तू तिचं जीवन बरबाद करायला जाऊ नकोस. तुला आई मिळेल पण ही सारी कहाणी जर तिच्या मुलांना, नवऱ्याला समजली तर तिची अवस्था काय होईल याचा विचार केलास तू ? तिला का तुला भेटावसं वाटत नसेल ? पण तिनं सारं आयुष्य काळजावर दगड ठेवून काढलंय. निदान तिच्यासाठी तुलाही तसंच काढाव लागेल. सतीश."

"नाही, बाबाजी नाही ! अनाथ म्हणून जगणं मला आता शक्य नाही."

"नाइलाजानं सहन करावं लागेल तुला... केवळ त्या मातेसाठी."

"नाही बाबाजी... मी कसं सांगू तुम्हाला ? हे वाचा... माझ्या पत्नीचं, सहधर्मचारिणीचं, जिच्यामुळे आईची उणीव भरून निघेल असं वाटलं होतं तिचंच पत्र आहे हे..."

एका हातातून दुसऱ्या हातात तो कागद थरथरायला लागला. बाबाजींची चष्मेरी नजर त्यावरून फिरली. त्यांच्याही मनात घालमेल झाली! त्यांनी एक दीर्घ सुस्कारा टाकला. कागद टेबलावर ठेवला आणि समोरच्या भिंतीवर टांगलेल्या गजाननच्या फोटोकडं एकटक पहात ते शांतपणे उद्‌गारले, "मला क्षमा कर... मला क्षमा कर..."

क्षणात त्या पत्राचा मुठीत करकचून चुराडा करीत डॉक्टर पोरासारखे ओरडले, "बाबाजी, मी आत्महत्या करीन !" भिंतीवरची पाल पडावी तशी बाबाजींची फोटोवरची नजर ढळली. म्हाताऱ्याचे भरलेले डोळे शुभ्र दाढीत टपकन् रिते झाले आणि डॉक्टरांच्या घळणाऱ्या धाराकडं तो वेड्यासारखा पहात बसला. मिनिटभर दोघेही शांत. काय बोलावं तेच सुचत नव्हतं शेवटी मागं फिरले. जवळच असलेलं कित्येक वर्षापूर्वीचं कळकट मळकट लाकडी कपाट उघडलं. थरथरत्या हातानं एक कागद हातावेगळा व्हायला लागला. एक कागद हातात आल्याबरोबर धुंडाळणारे हात तिथंच थांबले. डोळ्याजवळ नेऊन तो इकडं–तिकडं फिरवून पाहिला आणि ती लाख मोलाची गोष्ट हातात घेऊन ते डॉक्टरांसमोर एकटक पहात बसले. करारी डोळ्यांतून आवाज आला, "मला वचन हवंय."

"दिलं" झटकन् प्रत्युत्तर आलं.

बरी आठवण झाली ?" बाबाजी हसून म्हणाले, "तू तर नेहमी तीस तारखेलाच येतोस ना देणगी द्यायला?"

"होय, बाबाजी... पण काम होतं थोडं आपल्याकडं म्हणून..." डॉक्टरांचे गंभीर थोडे बालिश उद्गार ऐकून बाबाजी मनसोक्त हसले. म्हणाले, "अरे बोल ना... ह्या सांगाड्याला आणि कुठं जुंपणार तू?"

"पण आपण ते कराल ?"

"हे तुझं विचारणं झालं कारे बाबाजीला ?"

"मला वचन हवंय !" आता मात्र बाबाजींना काहीतरी गंभीर बाब असल्यासारखं वाटलं. क्षणात ते ही गंभीर झाले आणि चमकून उद्गारले, "वचन?"

"होय बाबाजी, वचन !"

"दिलं..."

"बाबाजी मला पत्ता हवाय."

"पत्ता ? कुणाचा ?"

"माझ्या आईचा !" डॉक्टर एखाद्या तिरासारखे बोलले. बाबाजींचा चेहरा गर्रकन् वळला. घटकेत ते खुर्चीवरून बाजूला झाले.

"ते... नाही... ते शक्य नाही बाळ."

"असं करू नका बाबाजी, आपण मला वचन दिलाय."

"...असेल, पण वचन तोडण्यापेक्षा पाळण्यातच मला अधिक पाप लागेल..."

"पाप ? कसलं पाप ? आई आणि मुलाची भेट घडवण्यात कसलं पाप घडणार आहे तुमच्या हातून?"

"घडू शकेल..." डॉक्टरांजवळ येऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरवत बाबाजी म्हणाले, "हे बघ सतीशा तुझ्या भावना का मी जाणू शकत नाही ? पण जरा विचार कर. दोन रस्ते एकमेकापासून दुरावलेत ते तसेच रहावेत आणि त्यातच तुमचं भलं आहे."

"भलं ? आमचं ? ते कसं काय ?"

"अरे, तू आता डॉक्टर झालास, लग्न केलास. आईच्या आशीर्वादानं सारं मार्गी लागलंय तुझं. पण आता तू तिचं जीवन बरबाद करायला जाऊ नकोस. तुला आई मिळेल पण ही सारी कहाणी जर तिच्या मुलांना, नवऱ्याला समजली तर तिची अवस्था काय होईल याचा विचार केलास तू ? तिला का तुला भेटावसं वाटत नसेल ? पण तिनं सारं आयुष्य काळजावर दगड ठेवून काढलंय. निदान तिच्यासाठी तुलाही तसंच काढाव लागेल. सतीश."

"नाही, बाबाजी नाही ! अनाथ म्हणून जगणं मला आता शक्य नाही."

"नाइलाजानं सहन करावं लागेल तुला... केवळ त्या मातेसाठी."

"नाही बाबाजी... मी कसं सांगू तुम्हाला ? हे वाचा... माझ्या पत्नीचं, सहधर्मचारिणीचं, जिच्यामुळे आईची उणीव भरून निघेल असं वाटलं होतं तिचंच पत्र आहे हे..."

एका हातातून दुसऱ्या हातात तो कागद थरथरायला लागला. बाबाजींची चष्मेरी नजर त्यावरून फिरली. त्यांच्याही मनात घालमेल झाली! त्यांनी एक दीर्घ सुस्कारा टाकला. कागद टेबलावर ठेवला आणि समोरच्या भिंतीवर टांगलेल्या गजाननच्या फोटोकडं एकटक पहात ते शांतपणे उद्गारले, "मला क्षमा कर... मला क्षमा कर..."

क्षणात त्या पत्राचा मुठीत करकचून चुराडा करीत डॉक्टर पोरासारखे ओरडले, "बाबाजी, मी आत्महत्या करीन !" भिंतीवरची पाल पडावी तशी बाबाजींची फोटोवरची नजर ढळली. म्हाताऱ्याचे भरलेले डोळे शुभ्र दाढीत टपकन् रिते झाले आणि डॉक्टरांच्या घळणाऱ्या धाराकडं तो वेड्यासारखा पहात बसला. मिनिटभर दोघेही शांत. काय बोलावं तेच सुचत नव्हतं शेवटी मागं फिरले. जवळच असलेलं कित्येक वर्षापूर्वीचं कळकट मळकट लाकडी कपाट उघडलं. थरथरत्या हातानं एक कागद हातावेगळा व्हायला लागला. एक कागद हातात आल्याबरोबर धुंडाळणारे हात तिथंच थांबले. डोळ्याजवळ नेऊन तो इकडं-तिकडं फिरवून पाहिला आणि ती लाख मोलाची गोष्ट हातात घेऊन ते डॉक्टरांसमोर एकटक पहात बसले. करारी डोळ्यांतून आवाज आला, "मला वचन हवंय."

"दिलं" झटकन् प्रत्युत्तर आलं.

Scanned with CamScanner

"त्या मातेला दुःख पोहोचेल अशी कोणतीही गोष्ट तू करू नयेस... मग त्यासाठी तुला कितीही दुःख सहन करावं लागलं तरीही."

"जरूर."

बाबाजी थोडा वेळ स्तब्ध राहिले. त्यांचे डोळे छताला लागले. कपाळावर आठया पडल्या कुठला तरी भुतकाळ ते डोळयासमोर पहायला लागले.

"तुला ठेवून गेल्यानंतर ती एकदाच आली होती. आपल्या लग्नाची पत्रिका द्यायला. दीड वर्षाचा होतास तू त्यावेळी. तासभर तुला मांडीवर घेऊन साऱ्या आयुष्यभराचं तिनं रडून घेतलं. पटापट तुझे पापे घेतले. तुझ्या बापानं फसवल्यामुळंच सारं आक्रित ओढवलंय म्हणून सारखी त्याच्या नावानं बोटे मोडत होती. तुझी नीट काळजी घ्यावी म्हणून माझ्या हातापाया पडली. तेव्हापासून जमेल तेव्हा ती पोष्टाने कुणाला न कळत पैसे पाठवायची. त्यावेळी ती मागं फिरली ते तुला न पाहण्यासाठीच. त्यानंतर ती मला कधीच भेटली नाही आणि मीही तिला भेटण्यासाठी प्रयत्न केला नाही... ही घे तिची पत्ता असलेली लग्नपत्रिका... जा..."

"बाबाजी !" डॉक्टर एकदम बाबाजींच्या गळयात पडले. बाबाजींचा प्रेमळ हात पाठावरून फिरला. म्हणाले, "तिला दुःख देऊ नकोस.."

पत्रिका घेतली आणि डॉक्टरांच्या मनाचं आभाळ निरभ्र झालं. कोवळया लुसलुशीत मजेदार प्रकाश किरणांची बरसात व्हायला लागली. मृगाचा पाऊस रिमझिम करून फेर धरायला लागला. पक्षी आनंदानं किलबिल करायला लागले. रंगीबेरंगी फुलांचे ताटवे चोहोदिशांना सुगंध उधळायला लागले. रोमारोमांत केवळ एक नि एकच भावना उरली– आनंद, केवळ आनंद !

डॉक्टरांच्या गाडीनं वेग धरला. मनाची गाडीही बेभान धावू लागली. आता माया गवसली होती. अनाथ म्हणून हिणवणाऱ्यांच्या तोंडात बसणार होती. पत्रानं डागणाऱ्या बायकोलाही प्रत्युत्तर मिळणार होतं. हळूच ती खिशातली पत्रिका समोर स्टेअरिंग जवळ ठेवली. चि. सौ. कां. विद्या हिचा ... हं ! आईचं नाव विद्या तर ! जादूच्या आरशात दिसावी तशी त्या पत्रिकेत आई दिसायला लागली... वय साधारण पंचावन्न वर्षे केसांना पांढुरकी चढायला लागलेय. गोरीपान, शांत, समाधानी, सात्विक चेहरा, प्रेमान ओथंबलेले नेत्र. तो ओथंबा गालावरून घळतोय 'रडत नाही ती. हसतेय ! तिला तिचा बाळ भेटला ना !' प्रेमाचा हात पुढं आला. रेशमी हात गालावरून फिरला. 'माझा बाळ' म्हणून तिनं बछड्याला छातीशी कवटाळलं. आकाश धरणीला भेटलं. 'आई' असा आवेग आयुष्यात प्रथमच बाहेर पडला. तीस वर्षापूर्वी बछड्याला ठेवून जाताना तिला काय वेदना झाल्या असतील तिच्या मनाला ? पण काय करणार ? आईचाही नाइलाज होता. तिच्यामुळं साऱ्या घराण्याला कलंक लागला असता म्हणून तिला माझ्यापासून दूर रहाणं भाग पाडलं असेल. कोणी निचानं तिच्याशी प्रेमाचं नाटक केलं असेल. आई फसली. पोटात जीव वाढतोय म्हटल्यावर त्यानं बाजू काढली असेल. कुमारी मातेला चोहो दिशा विराण झाल्या असतील. पण एवढयाशा बछड्याला झुडपात फेकुन देण्याइतकी ती नीच नव्हती खास. अनाथाश्रमात ठेवून जाताना तिचा जीव गुदमरून गेला असेल. पण पोटच्या पोरावर प्रेम दाखवणं हे ही समाज अनैतिक कृत्य म्हणून हिणवणार होता.

गाडी थांबली. अरे ! आपल्याला तर माळवे कॉलनीत जायचं होतं. आपण खूपच पुढं आलो की !' गाडी परत फिरली. माळवे कॉलनीच्या दिशेनं चाकं भरधाव गतीनं पळायला लागली. एक मन म्हणालं, "अरे कुठं चाललास तू ?"

"माझ्या आईकडे चाललोय मी"' दुसरं मन म्हणाल.

"पण तू अनाथ आहेस ना?"

"खबरदार !" दुसरं मन किंचाळून उठलं, "मला आई आहे... मला बापही आहे..."

गाडीची गती कुंठीत झाली. आता हिरे बंगला शोधायचा होता. पाऊलं तिकडं धावायला लागले.

Scanned with CamScanner

धावणारे पाऊल तिथंच थांबले. हिरे बंगला दिसला. आता आईही दिसणार होती.

एवढ्यात बावीस–तेविशीचा कोणी तरुण आतुन बाहेर आला. हातात बॅग होती. पाठोपाठ एक मध्यम वयस्क जोडपंही आलं. तरुणाचे हात आई–वडिलांच्या पायावर टेकले. आईनं तोंडात साखर टाकली. पाणी दिलं निरोप घेऊन तो जीना उतरला. पाठमोऱ्या पोराकडे पहात ती गॅलरीत उभी राहिली... डॉक्टर हे सारं डोळे फाडून पहात होते.'. डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. पुन्हा पत्रिका काढली. पत्ता बरोबर असल्याची खात्री झाली. म्हणजे ती, आई आहे तर ! माझी आई !! जी असून सुद्धा आपणाला अनाथ म्हणून जगावं लागलं ती आई !!! मघा दिसली तशीच. अगदी तशीच.

पाऊल आवेगानं पुढं सरले. एवढ्यात– 'थांब! ' एक कठोर आवाज आला. पाऊल तिथंच खिळले.

'कुठं चाललास ?'

'माझ्या आईकडं.'

'ते शक्य नाही.'

'का ? ती माझी आई आहे.'

'पण... समाज तुझा नाही. विचार केलास ? अरे अक्षरश: म्हातारपणात अनैतिकतेचा आरोप आणायला तु कारणीभूत होशील ते ? फिर मागे... तिचे चार दिवस तिला सुखानं काढू दे.'

'अरे घाल ना साद, आई म्हणून' दुसरा आवाज आला आणि 'तिच्या प्रेमळ मिठीत स्वत:ला विसावून दे... जा...' कंठात ताकद आली. हाकेसाठी तोंड उघडलं... तेवढ्यात कुणीतरी गळा दाबल्याचा भास झाला...

'थांब... बाबाजींना तु वचन दिलास ना ? चल फिर मागे...तू तिला दु:ख देऊ नकोस.'

कॉलनी दणाणून सोडणारी ती हाक छाताडातच घुमली.. तिथेच विरली...

गॅलरीतुन निरोपाचा हात हलत होता. 'बाळा लवकर ये.' कोमल, रसाळ आवाज आला.

'आई, मी पुन्हा कधीही येणार नाही, कधीच येणार नाही...' तिथंच प्रतिज्ञा केली. डोळे भरभरून पुन्हा दर्शन घेतलं. तिथूनच प्रणिपात केला. येणारा हुदका कष्टानं दाबून ठेवला. लडखडणारे पाय मागं फिरले.

गाडी आलेल्या दिशेनं निघाली.

## चिंतन

जेथे सतत उद्योग, निर्व्यसन आणि शुद्ध आचार विचार आहे तेथे गरीबी रहात नाही.

संगतीने संस्कार बदलतात पण स्वभाव बदलत नाहीत, स्वभाव जाणून स्वत:च बदल करावयाचा असतो.

संकलन– **बबन मोरे**
बी. ए. भाग ३

Scanned with CamScanner

# मराठी कविता

## मनोरा

धुंद डोळयांनी स्वप्नं फुलवताना
कल्पनांचे मनोरे उभारताना
आकाशातील चंद्र पाहताना
विसरलो पाय जमिनीवर ठेवायला
आता पाय जमीनीवर ठेवताना
पाहतो आहे
मनोरा ढासळताना.

— अनंत कुंभार
१२ वी विज्ञान

## नकोस जाळू सूर्य माझा

घेतली वाटून होतीस तूच माझी आसवे
अजून ना पानावले गडे तुझे निळे डोळे
घेतली होतीस तूच माझी पावले
नकोस नाकारू आता पाय माझे पांगळे
काय सांगू आता तुला आभाळच भारावले
नकोस जाळू सूर्य माझा किरण सारे गांजले
घेतली वाटून होतीस तूच माझी आसवे
अजून ना पानावले आभाळले तुझे डोळे

— सुंदरसिंग हजेरी
बारावी विज्ञान

## हताश मी !

सोडून गेलीस दूर तेव्हा
डोळ्यात आला महापूर
पापण्यावरच्या काठावरती
आसवाना मध्यान्ह भरती
थकली आता जीवन नौका
किनाऱ्याला मारती हाका
आठवणींचे वादळ होता
आधार मात्र दूर होता
नावीक मी थकलो होतो
म्हणून तुला बोलवीत होतो
तू मात्र थट्टा केलीस
हसत हसत निघून गेलीस

— एन. आर. पाटील
बी. ए. भाग २

## माऊली

तुझा आधार
आम्हा जगाला
गोष्टी सांगून
घडवतेस आम्हाला
कोणी शिकवले
आई तुला
घेतेस पोटात
आमच्या दुःखाला
तापत्या उन्हात
आम्ही सावलीला
तुझ्या आठवणी
उमाळे आम्हाला

— शालन हारळे
अकरावी साहित्य

## गर्दी

येत होते त्या गर्दीत
जाणारेही जात होते
कुणीतरी अडखळते
क्षणभर नजरभेट होते
हळूच ओठ विलगतात
डोळ लाजेने हसतात
मोहाने अंग शहारते
स्वप्नावली फुलारतात
पण पुढचे पाऊल इथे
कधीच पडत नसते
आपला मार्ग शोधू लागते
कारण ती गर्दी असते

— लता गवळी
बी. एस्सी. भाग ३

## मित्रत्व

सायीदार भेटला मला
जाऊ लागलो शाळेला
नाही क्षण गेला
तुज सोडुनी मला
कोण बोलता मला
येई राग तुला
शांत करूनी मला
असा स्नेह दिला मला।
काय घडलं कारण
झालं तुझं–माझं भांडण
कुलपे बसली तोंडाना
शब्द बाहेर फुटेना
नाही गेला वेळ
गेला नाही काळ
आली एक क्षणाची वेळ
तोंडांनी उघडली कळ
आला नद्यांना पूर
भेटल्या समुद्राला
आला मनाला पूर
मुखानी उच्चारला स्वर

– विष्णू कुराडे
बी. ए. भाग २



## विचार

विचार करून करून
आयुष्य माझे झीजत होते
त्यातून काही समजत नव्हते
विचाराने डोके जड झाले होते
कोणताही मार्ग सुचत नव्हता

आयुष्याची सीमा पार करताना
मध्येच विचाराची लाट पुन्हा आली
ही लाट दुसरीकडे ओढत होती
मन माझे ओढले गेले
पायाखालची वाळू घसरत होती

विचाराचा ध्यास धरून
धोपट मार्ग चालताना
आलेल्या संकटांना तोंड देता येईना
विचार करून करून,
आयुष्य तेवढे झीजत होते.

– राजू महाजन
बी. ए. भाग ३

## भेदभाव

प्रकाशाला प्रकाश
अंधाराला अंधार
सखा असतो
सुखदु:खाच्या गगनात
आपण उगाच
फिरत असतो

– सुधीर सुरंगे
बी. कॉम. भाग ३

## आठवण

जीवनात येऊनी माझ्या
प्रिये काय दिलेस मला
ह्रुदयातील अमोल ठेवा
ठेवला तुझ्या मी वाटेला
मला देताना नजरेचा क्षणही
तुला का मोलाचा वाटला ?
जीवनात येऊन विराण माझ्या
प्रिये काय दिलेस पुन्हा मला ?

– शशिकांत माने
बी. ए. भाग २



Scanned with CamScanner

## कशाला

प्रेम त्याच्याशी करायचे नव्हते तर,
वचन त्याला दिलीस कशाला ?
कायम अबोला धरायचा होता तर,
आणा–भाका घेतलीस कशाला ?
आई–बापाचा एवढा धाक होता तर,
जीवनात त्याच्या आलीस कशाला ?
श्रीमंतीची तुला एवढी घमेंडी होती तर,
गरीबाशी डाव मांडलीस कशाला ?

– एम् एस्. मोरे
बारावी कॉमर्स

## भ्रष्टाचार

चालला आहे सगळीकडे भ्रष्टाचार
पोटासाठी लोक करताहेत हानामार
निष्पाप मने जाताहेत चिरडून
माणुसकीचे नाते दिले साऱ्यांनी सोडू
स्वार्थी माणसे आता गब्बर झाली
मतलबासाठी दीन जीवांवर पावले फि
अधिकारी लोक करताहेत खाबूगिरी
बँकींगचे सर्व व्यवहार केले जातात.

चेअरमन — श्रीपतराव ब. देसाई

व्हा. चेअरमन — पांडुरंग रा. देसाई

व्यवस्थापक: **बी. बी. पाटील**

---

*WITH BEST COMPLIMENTS FROM :*

# M/s. VINAYAK TILES

*Manufacturers of :*

**MARBLE MOSAIC TILES, CONCRETE GUTTERS AND GRILLS.**

Bhadgaon Road, Gadhinglaj, Dist. Kolhapur,
GADHINGLAJ-416502, Pnone : 295

**Shri Golatge Bros.**

Scanned with CamScanner

## College

I like College,
But that is in the village.
I want to go to voyage.
But I have a heavy luggage.
I want to write a passage,
But there is no message.
I want to live in college,
But there is food shortage.

**Chothe R. R.**
B. A. I

## Morning

How dark and darknes
All passing swiftly back.
But faint had lively
In the faint . . .
'Cuckoo' singing blithe
Burden of his song
'Morn' has been come.

**Appaso R. Devarkar**
B. A. II

## Love

Love a precious coin
Has two sides
Man and woman
Love a swift train
Runs over two Rails
Man and woman
Love strickly cement
Joins two hearts
Difficult to set them apart
Love a sweet war
Easy to start
But difficult to stop.

**Zirale Subhash A.**
B. A. II

## Loneliness

The month was June
The date was nine,
The journey happened by mine,
It was short fine,
In front of me
One couplet was joying,
They were laughing,
. . . And kissing
On the other side–
One mother was jocking,
The child was laughing
. . . But refusing to kissing.
I was thinking.
About this contrast,
And made nervous,
For My loneliness

**Rajaram Patil**
B. A. III

## Happy Sickness

Ever, I like thou, sickness
What a heaven thrill thou
Give ! When thy rigid thickness
Located me my beloved love
Me more, my friends, parents,
Kith and kins visit me most,
Heap of fruits, variety-treatments
Had been offered, at most
Nursed me. No Lords and Angels,
No Kings and Queens, No Gods
Got happy. In such even angels
And devotees do not worship Gods.
O Lord of sickness do me wound
Make me to love every one sound

**Rajanna**
M. A. II



Scanned with CamScanner

## I Ought to love My Country

I ought to love my country.
the land in which I live,
Yes, I am very sure my heart
its truest love should give.
For, if i love my country
I'll try to be a man,
my country may be proud of
and if i try, i can.
She wants man brave and noble,
She needs men true and kind,
My country needs that i should be
The best man she can find.

**Sandeepkumar Kagavade**
S. Y. B. A.

## Grief

Grief is a hand of human,
And glad is a hand of human.
Hands are two left and right,
But both has same hight.
So you don't cut a hand of grief
If there is grief in your life,
Then there is interesting trip of life
If in your life there is pain,
Then only you have a aim,.
But never show your pain,
Try to reach your aim,
Try to become successful,
Try Try but don't cry,
Live like a butterfly,
Happy-Happy and so Happy.

**Shashikant Pitake**
B. Sc, II

## You are Special

You are like a beautiful flower,
that beautifies the garden,
You are like a sparkling diamond
so precious is your worth.
You are like a golden sunbeam
chasing the cloud
You are like early down,
that spreads hope around.
You bring some precious moments
to treasure day by day.

**Miss. S. A. Shintre**
F. Y. B.Sc.

## Death and Night

If I lived today
I shall do something tomorrow
If I died today
I shan't do anything tomorrow
If I slept at night
I shall paint dream
If I have no sleep
I shan't paint dream
So I have to do something
Which can't do after death
I have to paint dream
Which can't paint after wake
Because life is not wait for me
and night is not stop for my sleep

**Saptale S. R.**
B. A. III



Scanned with CamScanner

# जिमखाना अहवाल

## १९८९-९०

शिवाजी विद्यापीठ कायद्यानुसार यावर्षी ५ ऑगष्ट १९८९ रोजी महाविद्यालयाच्या निवडणूका अत्यंत उत्साही वातावरणात पण शांततेने पार पडल्या.

विद्यार्थिनी प्रतिनिधी मंगल लोखंडे व विद्या मगदूम. विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून श्री. देसाई डी. जी. यांची बहुमताने निवड झाली.

जिमखान्याचे उद्‌घाटन मा. प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले साहेबांचे शुभहस्ते झाले.

कनिष्ठ महाविद्यालयातील निवडणूक ही सर्वानुमते चिठ्ठ्या पद्धतीने झाली.

या वर्षीचा वार्षिक जिमखाना अहवाल लिहिताना मला खरोखरच अत्यंत समाधान वाटत आहे. कारण १९७२ नतर यावर्षी आमच्या महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर जिल्हा विभागीय स्पर्धा आयोजनाचे यजमान पद मिळाले. सर्व महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, प्राचार्य, आमच्या महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी या सर्वांच्या बहुमोल सहकार्याने या स्पर्धा आम्ही व्यवस्थितपणे पार पाडू शकलो.

कोल्हापूर जिल्हा आंतरमहाविद्यालयीन विभागीय क्रीडास्पर्धेचा शुभारंभ यावर्षी कुस्ती स्पर्धेने झाला. या स्पर्धेचे उद्घाटन जाकार्ता सुवर्ण पदक विजेते, अर्जुनवीर, हिंदकेसरी पैलवान गणपतरावजी आंदळकर यांच्यासारख्या सर्वश्रेष्ठ कुस्तीगीरांच्या हस्ते झाले. या उद्‌घाटनाला अध्यक्ष म्हणून आमच्या भागातील प्रसिद्ध पैलवान महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर हे लाभले. या कुस्ती स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ज्यांनी राजाश्रय देऊन कोल्हापूरला कुस्ती कला वाढविली. त्या छत्रपती शाहू महाराजांचे नातू, कागल तालुक्याचे माजी आमदार, कागल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. विक्रमसिंहजी घाटगे यांच्या शुभहस्ते पार पडला. या समारंभासाठी रशियाहून खास कुस्ती शिक्षण घेऊन आलेले, शिवाजी विद्यापीठाचे कुस्ती प्रशिक्षक मा. बापूसाहेब भोसले हे अध्यक्ष म्हणून लाभले. यानंतर वर्षभर झालेल्या निरनिराळ्या खेळासाठी वेगवेगळे पाहुणे आम्हास उद्‌घाटनासाठी मिळाले.

**कबड्डी :** मा. एस. बी. घुगरे, जेष्ठ शारीरिक शिक्षण संचालक शाहू इन्स्टिटयूट, कोल्हापूर.

**बॅडमिंटन :** मा. व्ही. आर. पाटील, डेप्युटी रजिस्ट्रार, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**पोहणे :** मा. उदयरावजी पोवार, उपमहापौर, कोल्हापूर महानगरपालिका.

**बास्केटबॉल :** मा. एस्. ए. जर्दे, सिनेटर विधीसभा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.

**खोखो :** मा. मगदूमसाहेब, प्राचार्य जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.

**व्हॉलीबॉल :** मा. कशाळीकरसाहेब, प्राचार्य देवचंद कॉलेज, अर्जुननगर.

**बुद्धीबळ :** मा. शिंदेसाहेब, प्राचार्य राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

**टेबल–टेनीस :** मा. पी. आय. मस्कर, शिवाजी विद्यापीठ ॲथलेटिक्स् कोच.

**फुटबॉल :** मा. डॉ. संकेश्वरी, लायन्स क्लब अध्यक्ष, गडहिंग्लज.

**क्रिकेट :** मा. तोगलेसाहेब, प्राचार्य शिवराज कॉलेज, गडहिंग्लज.

**हॅन्डबॉल :** मा. आर. व्ही. शेडगे, शारीरिक शिक्षण संचालक, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

**हॉकी :** मा. इम्तिहाज आत्तार, माजी विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ हॉकी खेळाडू.

**ॲथलेटिक्स् :** मा. शिवप्रकाश गालीमठ, पोलीस उपनिरीक्षक, गडहिंग्लज.

अशाप्रकारे मोठमोठ्या सन्माननीय व्यक्ती उद्घाटक म्हणून लाभल्या. कोल्हापूर जिल्हा विभागीय स्पर्धा आम्ही या वर्षी तेवढ्याच तोलामोलाने पार पाडल्या हे सांगण्यास मला अभिमान वाटत आहे.

## क्रिडा क्षेत्रातील गौरवास्पद कामगिरी

कोल्हापूर जिल्हा विभागीय स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या ज्या विद्यार्थी–विद्यार्थीनींनी भाग घेतला होता त्याची माहिती.

**कुस्ती :** १) कुरळे एस. डी. २) जाधव ए. के. ३) म्हनागडे व्ही. ए. ४) दळवी आर. आर. या चार कुस्तीगीरांनी भाग घेतला. प्रत्येकाने आपापल्या गटात चांगल्या लढती दिल्या, जाधव हा कुस्तीगीर एकूण सात कुस्त्या खेळला. परन्तु त्याला चौथ्या नंबरवरच समाधान मानावे लागले.

**कबड्डी :** यामध्ये भाग घेतलेले विद्यार्थी पाटील टी. एम, ढेकोळकर पा. टी., पाटील एस. एम, सोलापुरे बी. डी., पांढरे एस. डी., जाधव यू. के., आंबीटकर व्ही. बी., पाटील व्ही. आर., पाटील के. एम., या सर्वांनी दोन सामने जिंकले. विशेष म्हणजे पाटील टी. एम. याचा खेळ फारच चांगला झाला. या संघाने यावर्षीही नंदगड जि. बेळगांव येथील ट्रॉफी जिंकून आणली.

**खो–खो (मुले) :** जाधव एस. एम., मुगळीकर आर. एन., शिंदे के. के., पोवार एस. व्ही. गाडीवड्डु बी जी., माने एस. एस., पाटील व्ही. डी., कांबळे ए. एम., पन्हाळकर एच. एम., शेटके एस. एन. कळेकर एम. एस., पाटील ए. एम. या संघाने दोन सामने जिंकून उपान्त्य फेरीपर्यंत मजल मारली. यामध्ये पाटील, कांबळे व शिंदे यांचा खेळ प्रेक्षनीय झाला.

**खो–खो (मुली) :** पोवार एस. बी., नदाफ एस. ए., कदम ए. जी., चव्हाण बी. ए., देवेकर एस. एम., मगदूम व्ही. डी, पवार एस. बी., सोले एस एस., शहा डी. एस., शिंदे एन. बी. यामध्ये सर्वच मुलींचा खेळ चांगला झाला

**बुद्धीबळ :** जोशी व्ही. ए, पाटील ए. एस., खुडे एस. ए, खटावकर बी. व्ही., बागवान जे. आय. आमच्या या संघाने २४ पैकी १६.५ गुण मिळविले.

**टेबल टेनीस :** दड्डी एम. एस., शिंदे व्ही. व्ही., भाट डी. एस., खटावकर बी. व्ही. आम्ही या खेळामध्ये प्रथमच प्रवेश केलेला असूनही आमच्या विद्यार्थ्यांचा खेळ वाखाणण्यासारखा झाला.

**फुटबॉल :** पकाले ए डी., शिंदे एस. व्ही., शेटके एस. एन., कापशे डी. बी., पोवार एम. एस., पोवार ए एम., मोरे एम. ए., शेटके बी. एस., म्हरांवळे एम. वाय., बरुड एस. आर., पाटील पी. एस., पेडणेकर एन. एम., खोराटे डी. जी., देसाई झेड. बी., दळवी आर. ए., दळवी एम. ए. आमच्या या संघाने दोन सामने जिंकून उपान्त्य फेरीपर्यंत मजल मारली. या स्पर्धेत पकाले बुरुड व पोवार यांचा खेळ सुरेख झाला.



Scanned with CamScanner

- ४ X ४०० मी. रिले – प्रथम क्रमांक
  १) चव्हाण ए. एस. ४) खोत आर. जी.
  २) मगदूम डी. बी. ५) खटावकर पी. व्ही.
  ३) म्हेत्री के. के.

- कु. पोवार सुगंधा भैरु – बी. ए. भाग ३
  २०० मीटर धावणे – दुसरा क्रमांक
  ४०० मीटर धावणे – तिसरा क्रमांक
  ८०० मीटर धावणे – दुसरा क्रमांक

सोलापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय ॲथलेटिक्स् स्पर्धेतील यशाचे मानकरी

- म्हेत्री किशोर के. – बी. ए. भाग ३
  पोल हॉल्ट (बाबू उडी) – दुसरा क्रमांक
- चव्हाण अशोक एस. – बी. कॉम. भाग २
  ८०० मीटर धावणे – तृतीय क्रमांक

या वर्षीच्या क्रीडास्पर्धेतील सर्व भाग घेतलेल्या व विजेत्या खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन.

**प्रा. ए. एस. नाळे**
जिमखाना चेअरमन व
सेक्रेटरी कोल्हापूर झोनल स्पोर्टस् कौन्सिल

## संभाजीराव माने ज्युनियर कॉलेज वार्षिक क्रीडा अहवाल

क्रीडाक्षेत्रात आमच्या खेळाडूंनी नेत्रदीपक नैपुण्य दाखविलेले असून कॉलेजला अनेक क्रीडा स्पर्धेमध्ये सुयश मिळवून दिले. गडहिंग्लज तालुक्यामध्ये शासकीय हिवाळी क्रीडा स्पर्धेमध्ये तालुक्याची चॅम्पीयनशीप मिळवून कोल्हापूर जिल्हा विभागीय स्पर्धेत अनेक विद्यार्थी चमकले व महाराष्ट्र राज्य क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या ज्युनियर कॉलेजच्या सहा खेळाडूंची निवड झाली व ज्युनियर कॉलेजची परंपरा जतन करून वृद्धिंगत केली.

**हॉकी :** गडहिंग्लज येथे झालेल्या शालेय हिवाळी क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या ज्युनियर कॉलेजने सतत तीन वर्षे हॉकीमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला व जिल्हा स्तरावर उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. यामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंची नावे– आय. डी. पताडे, आर. ए. कसेकर, डी. ए. पाटील, ए. बी. कडके, जी. ए. देसाई, पी डी. पताडे, एन. एन. चोथे, एम. ए. सुतार, एस. ए. शेलार, के बी. बेलद, आर. बी. जगताप, आर. एम. पोटे, व्ही. के. पाटील, आर. एम. कोळगे, पी. एम. सावेकर, आर. के. आसवले'

**कबड्डी :** गडहिंग्लज येथे झालेल्या शासकीय पावसाळी क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या संभाजीराव माने ज्युनियर कॉलेजने प्रथम क्रमांक संपादन केला व जिल्हास्तर येथे सेमीफायनल पर्यंत मजल मारली. या स्पर्धेतील खेळाडू– जे जी. देसाई, एम. एम. धुरे, एस. एस. आर्दाळकर, ए. टी. पाटील, एस. पी. खोत, आर. ए. मोरे, एस. ए. देशवळ, ए. जे. पाटील, जे. एस. पाटील, एस. पी. सावंत.

**हॅन्डबॉल :** गडहिंग्लज येथे झालेल्या शासकीय पावसाळी क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या संभाजीराव माने ज्युनियर कॉलेजने द्वितीय क्रमांक संपादन केला. या स्पर्धेमधील खेळाडू– आय. डी. पताडे, आर. एम. पोटे, एस. एम. कुपटे, आर. ए. कसेकर, पी. डी. पताडे, आर. के. आसवले, एम. ए. सुतार, के. बी. बेलद, जे. एम. पाटील.

**ॲथलेटिक्स् :** गडहिंग्लज येथे झालेल्या हिवाळी ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये सर्वाधिक जास्त गुण मिळवून गडहिंग्लज तालुक्याची जनरल चॅम्पियनशीप पटकाविली व जिल्हास्तर, विभागीय स्तर व महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स् स्पर्धेसाठी सहा खेळाडूंची निवड झाली. कंचन बाबुराव बेलद हा १०० मी. धावण्याच्या स्पर्धेमध्ये तिसरा आला.



Scanned with CamScanner

**क्रिकेट** : पेडणेकर एन. एम., नाईक एस. आर. मोरारे डी. जी., शिंदे एम. व्ही., पोवार एम. एम., खटावकर बी. व्ही. देसाई झेड. बी., चित्रे एम. ए., देशपांडे जी. एम., देसाई आर. एन., गवळी बी. के., पाटील पी. एम., जाधव पी. एम. क्रिकेट मध्ये यावर्षी आमचा प्रथमच प्रवेश आहे. असे असुन सुद्धा आमच्या विद्यार्थ्यांनी चांगला खेळ दाखविला.

**हॅन्डबॉल (मुले)** : मगदूम डी. बी., वाली के. एम., कोकीतकर ए. बी., खटावकर पी. व्ही., पाटील व्ही. आर., खटावकर बी. व्ही., मनवाडकर एल. एच यावर्षी प्रथमच आमच्या संघाने भाग घेतला. मगदूम व खटावकर यांचा खेळ छानच झाला.

**हॅन्डबॉल (मुली)** . पोवार एस. बी., कदम ए. जी., मगदुम व्ही. डी., पवार एस. बी., पाटील एस. एम., देवेकर एस. एम., पाटील एम. एस., शहा डी. एस. चालू वर्षी नवीनच हा खेळ विभागीय स्पर्धेत समाविष्ट केलेला आहे. नवीन खेळ असूनसुद्धा आमच्या विद्यार्थीनींनी चांगलेच खेळाचे प्रदर्शन करून विभागीय स्पर्धेत उपविजेते पद पटकावले. या विजयाचे संपूर्ण श्रेय सुनिता पाटील, विद्या मगदुम, संगीता देवेकर सुगंधा पोवार व गोलरक्षक सुरेखा पवार याना आहे.

**हॉकी (मुले)** ; खटावकर बी. व्ही., शिंदे एस. व्ही., खटावकर पी. व्ही., जाधव एस. एस., वाली के. एस., मगदूम डी. बी., कोकीतकर ए. बी., मनवाडकर डी. बी., पाटील व्ही. आर., चिगरे यू. ए., कोकीतकर एस. वाय., मुगळीकर आर. एन., डिसोझा व्ही. आय. या आमच्या संघाने उपान्त्य स्पर्धेपर्यंत चांगली लढत दिली. खटावकर मगदूम व जाधव यांचा खेळ सुरेख झाला.

**हॉकी (मुली)** : पोवार एम. बी., शहा डी. एस., कदम ए. जी. मगदूम व्ही. डी., सोले एस. एस., पवार एस. बी. देवेकर एम. एम., पाटील एम. एस., पाटील जे. के., बांदेकर ए. ए., पाटील एस. एस. या वर्षी नवीनच या स्पर्धेचा विभागीय स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धेत आमच्या मुलींच्या संघाने अंतीम सामन्यात चांगलीच लढत देऊन कोल्हापूर विभागाचे उपविजेतेपद मिळविलेले आहे. सुगंधा पोवार सुरेखा पवार, सुनिता पाटील, संगीता देवेकर, दिपा शहा यांचा उपविजेते पद मिळविण्यात सिंहाचा वाटा आहे.

**ॲथलेटिक्स् (मुले)** : चव्हाण ए. एम., जाधव पी. बी., नाईक एस. आर. खटावकर पी. व्ही. पाटील के. एम., म्हेत्री के. के., मगदूम डी. बी., उत्तुरे आर. जी., पाटील के. बा., नाईक एस. डी., माने एस. एस., नाईक एन. बी., खोत आर. जी.

**ॲथलेटिक्स् (मुली)** : पोवार एम. बी., मगदुम व्ही. डी., शहा डी. एस., कदम ए. जी., पवार एस. बी., बांदेकर ए. ए., पाटील जे. के. कोल्हापूर विभागीय स्पर्धेमध्ये ॲथलेटिक्स् स्पर्धेमध्ये "ॲथलेटिक्स् म्हणजे शिवराज कॉलेज" हे समीकरण होऊन गेलेले आहे आणि हे किती बरोबर आहे त्याचे प्रात्यक्षिक आमच्या स्वतःच्या मैदानावर आमच्या मुला–मुलींनी दाखविले. या स्पर्धेतील यशाचे मानकरी–

- चव्हाण ए. एम – बी. कॉम. भाग २
  - ४०० मीटर हर्डल्स् – पहिला क्रमांक
  - ४०० मीटर धावणे – तिसरा क्रमांक
  - ८०० मीटर धावणे – तिसरा क्रमांक
  - ११० मीटर हर्डल्स् – तिसरा क्रमांक
- म्हेत्री के. के. – बी. ए. भाग ३
  - पोल व्हॉल्ट (बांबू उडी) – दुसरा क्रमांक
  - ४०० मीटर हर्डल्स् – तिसरा क्रमांक
- पाटील के. एम. – बी. ए. भाग १
  - ४०० मीटर हर्डल्स् – दुसरा क्रमांक
- नाईक एस. डी – बी. कॉम. भाग २
  - थाळी फेक – दुसरा क्रमांक

या स्पर्धेतील यशस्वी खेळाडू-

✦ कंचन बाबूराव बेलद – ११ वी सायन्स

गडहिंग्लज तालुका-

१०० मीटर धावणे – प्रथम क्रमांक

२०० मीटर धावणे – द्वितीय क्रमांक

कोल्हापूर जिल्हा स्तर :

१०० मीटर धावणे – प्रथम

विभागीयस्तर सातारा :

१०० मीटर धावणे – प्रथम

महाराष्ट्र राज्य, सोलापूर :

१०० मीटर धावणे – तृतीय

✦ संपत पुंडलीक सावंत – ११ वी आर्टस्

गडहिंग्लज तालुका पातळी :

१०० मी. व ४०० मी. धावणे : प्रथम

कोल्हापूर जिल्हा स्तर :

२०० मी. धावणे द्वितीय व ४०० मी. प्रथम

✦ सुरेश मारुती म्होत – ११ वी आर्टस्

गडहिंग्लज तालुका पातळी :

गोळा फेक प्रथम व थाळी फेक तृतीय

कोल्हापूर जिल्हा स्तर :

गोळा फेक तृतीय

✦ इंद्रजीत धोंडिराम पताडे – १२ वी आर्टस्

गडहिंग्लज तालुका पातळी :

२०० मी. व ४०० मी. धावणे प्रथम

४X१०० व ४X४०० मी. रिले रेस प्रथम

कोल्हापूर जिल्हास्तर :

२०० मी. धावणे द्वितीय व ४०० मी. तृतीय

४ X १०० मी. रिले रेस द्वितीय

४ X ४०० मी, रिले रेस प्रथम

विभागीय जिल्हास्तर सातारा :

४ X ४०० मी, रिले रेस प्रथम

✦ रावसाहेब आण्णा कसेकर – १२ वी आर्टस्

गडहिंग्लज तालुका पातळी :

८०० मी. धावणे द्वितीय व ५००० मी. प्रथम

४ X १०० व ४ X ४०० मी. रिले रेस प्रथम

कोल्हापूर जिल्हास्तर :

४X१०० मी. रिले रेस द्वितीय

४ X ४०० मी. रिले रेस प्रथम

विभागीय जिल्हास्तर सातारा :

४ X ४०० मी. रिले रेस प्रथम

✦ प्रकाश धोंडीराम पताडे – ११ वी आर्टस्

गडहिंग्लज तालुका पातळी :

४X१०० व ४X४०० मी. रिले प्रथम

कोल्हापूर जिल्हास्तर :

४X१०० मी. रिले रेस द्वितीय

४X४०० मी. रिले रेस प्रथम

विभागीय जिल्हास्तर सातारा :

४X४०० मी. रिले रेस प्रथम

✦ राजेंद्र मारुती पोटे – १२ वी सायन्स

गडहिंग्लज तालुका पातळी :

४०० मी. धावणे द्वितीय

४X१००मी. ४X४०० मी. रिले रेस प्रथम

कोल्हापूर जिल्हास्तर :

४ X १०० मी. रिलेरेस द्वितीय

४ X ४०० मी. रिलेरेस प्रथम

विभागीय जिल्हास्तर सातारा :

४ X ४०० मी. रिलेरेस प्रथम

✦ राजेंद्र कृष्णा बासवले – ११ वी आर्टस

गडहिंग्लज तालुका पातळी :

४ X ४०० मी. रिले रेस प्रथम

कोल्हापूर जिल्हास्तर :

४ X ४०० मी. रिले रेस प्रथम

विभागीय जिल्हास्तर सातारा

४ X ४०० मी. रिले रेस प्रथम

✦ अनिल कल्लाप्पा बिरंजे – ११ वी सायन्स

गडहिंग्लज तालुका पातळी .

१५०० मी. धावणे प्रथम

लांब उडी द्वितीय

कुस्ती–प्रथम

✦ जोतीबा मायाप्पा पाटील – ११ वी सायन्स

गडहिंग्लज तालुका पातळी

थाळी फेक तृतीय, गोळा फेक द्वितीय,

भालाफेक तृतीय.

✦ एस. टी. सोनार – १२ वी आर्टस

वार्षिक स्नेहसम्मेलन क्रीडास्पर्धेमध्ये सर्वाधिक्य गुण संपादन करून सन १९८९–९० सालची वैयक्तिक जनरल चॅंपियनशीप संपादन केली.

**प्रा. एस्. एस्. सावंत**
खेळ विभाग प्रमुख

## ग्रंथालय वार्षिक अहवाल १९८९–९०

ग्रंथ हे गुरु असे म्हटले जाते. शिक्षणाचा आत्मा म्हणजे गुरू आणि हा आत्मा जेथे वास करतो त्यास ग्रंथालय असे संबोधले जाते. कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा दर्जा हा त्या संस्थेच्या ग्रंथालयाच्या दर्जावर ठरत असतो. ग्रंथालयाचा दर्जा ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथावर ठरतो. ग्रंथ किती आहेत यापेक्षा कसे आहेत यावरच दर्जा ठरतो. उत्कृष्ठ ग्रथच विद्यार्थी वाचकावर उत्तम सस्कार करतात. आमचा विद्यार्थी उत्तम संस्कार धारण करणारा आहे आणि म्हणूनच आमचे ग्रंथालय उत्तम दर्जाचे आहे.

विद्यार्थी, प्राध्यापकांची शैक्षणिक, क्रमीक पुस्तकाबरोबरच आवांतर वाचनाची, संदर्भ ग्रंथाची गरज उत्तम तऱ्हेने सांभाळली जाते. नवनवीन संदर्भ ग्रंथ, दर्जेदार ललित ग्रंथ, आवश्यक स्वरूपाची नियतकालीके सर्वांना पुरवली जातात. हा दर्जा टिकावा यासाठी संस्थेचे अध्यक्ष खा. बाळासाहेब माने व प्राचार्य डॉ. डी व्ही. तोंगले नेहमी प्रयत्नशील आहेत. येत्या एक दोन वर्षात ग्रथालयाची इमारत पूर्ण होईल. सात लाख रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या या आद्ययावत इमारतीमुळे आमच्या ग्रंथालयाचा कायापालट होईल.

या वर्षी एकूण ५८७ इतके ग्रंथ खरेदी केले असून Encounter Essays in criticism, Language teaching, The Journal of Aesthetics and Art Criticism, a University New अशी दर्जेदार मासिके सुरू केली आहेत. विविध विषयावरील एकूण ६० नियतकालीके ग्रथालयात येतात.

स्पर्धात्मक परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून ग्रंथालयात एक स्वतंत्र विभाग सुरू केला आहे. पुस्तक पेढीचीही सोय आहे. गरीब हुषार विद्यार्थ्यांना, खेळाडूंना विशेष सवलती ग्रंथालयातून देऊन त्यांच्या अभ्यासाची गरज भागवली जाते.

⊙ दृष्टीक्षेपात ग्रंथालय

| | | |
|---|---|---|
| एकूण ग्रंथसंख्या | – | ३५५८७ |
| एकूण किमत | – | ६,२०,०००–०० |
| नियतकालिके | – | ६५ |
| वार्षिक वर्गणी | – | ९०००–०० |
| पुस्तक देवघेव वेळ | – | सकाळी ८–३० ते १२–३० दुपारी ४ ते ६ |
| अभ्यासिका, (रिडींगरुम) | – | सकाळी ८–३० ते रात्री १२ पर्यंत |

**श्री. टी. ए. पाटील**
ग्रंथपाल

## 'शिवांजली' भित्तीपत्रक

दरवर्षीप्रमाणे १९८९–९० या शैक्षणिक वर्षात 'शिवांजली' या भित्तीपत्रकाचे अंक दर्जेदार साहित्याने



Scanned with CamScanner

सजलेले होते. विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या साहित्य-गुणांना वाव मिळावा या हेतूने शिवराज महाविद्यालयाच्या वतीने 'शिवांजली' हे भित्तीपत्रक चालविले जाते. या भित्तीपत्रकात लघुकथा, लघुनिबंध, कविता, वैचारिक लेख, संकलन अशा स्वरूपाचे विद्यार्थ्यांचे साहित्य प्रसिद्ध केले जाते. या वर्षी देखील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उदंड होता.

**प्रा. अनिल गवळी**
भित्तीपत्रक विभाग प्रमुख

## वसतिगृह

वसतिगृह म्हणजे महाविद्यालयाचा आत्मा होय. वसतिगृहामध्ये राहून विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारे ज्ञान घेता येते. वसतिगृह हे सहजीवनाचे एक साधन आहे. येथे राष्ट्रीयत्वाचा विकास करण्यास फारच मदत होते. परंतु हा आत्माच आमच्या महाविद्यालयात नाही याचे फार मोठे दुःख आम्हा सर्वांना आहे. वसतिगृहाची उणीव भासू नये म्हणून तुटपुंज्या जागेत व कमी भाड्यामध्ये मोजक्याच विद्यार्थ्यांची आम्ही राहण्याची व्यवस्था केलेली आहे गवळी वाड्यात चार खोल्या आम्ही वसतिगृहासाठी भाड्याने घेतलेल्या असून या ठिकाणी महाविद्यालयाचे बारा विद्यार्थी राहतात. प्रत्येक विद्यार्थ्याला टेबल खुर्ची व कॉट असे साहित्य पुरविलेले आहे. मर्यादित जागा असलेमुळे जास्त विद्यार्थ्यांची आम्ही राहण्याची व्यवस्था करू शकत नाही. चंदगड, आजरा तालुक्यातील दुरच्या गांवातून विद्यार्थी येथे आमच्या महाविद्यालयात शिक्षणासाठी येतात. गडहिंग्लज शहरातील राहण्याच्या जागेची टंचाई व भरमसाठ वाढलेले भाडे यामुळे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी बाहेर खोल्या भाड्याने घेऊन राहू शकत नाहीत. त्यामुळे आम्ही तात्पुरती ही विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था केलेली आहे. फारच मोठ्या संख्येने विद्यार्थी वसतिगृहामध्ये राहू इच्छितात. या सर्वांची गरज भागविण्यासाठी यू. जी. सी. अनुदानातून एखादे अत्याधुनिक सर्व सोयींनी युक्त अशी स्वतःच्या मालकीची स्वतंत्र इमारत व्हावी ही सर्वांची इच्छा आहे. पाहूया केव्हा भाग उजाडते !

**प्रा. ए. एस. नाळे**
वसतिगृह प्रमुख

## पदव्युत्तर विभाग अहवाल १९८९-९०

शिवराज महाविद्यालयातील पदव्युत्तर विभागाने गडहिंग्लज परिसरातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे महत्त्वपूर्ण कार्य सततच केलेले आहे. मराठी, हिन्दी, समाजशास्त्र आणि इंग्रजी या विषयांचे अध्यापन या विभागामार्फत केले जाते. महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यांतील विद्यार्थी आमच्या महाविद्यालयातील पदव्युत्तर विभागाचा लाभ घेत आहेत. निष्णात प्राध्यापक वर्ग व समृद्ध ग्रंथालय यामुळे या महाविद्यालयातील पदव्युत्तर विभाग आपली प्रगती करीत आहे. मा. प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले यांच्या मार्गदर्शनाने हा विभाग चांगले कार्य करीत आहे.

**प्रा. बलवंत देशमुख**
विभाग प्रमुख

## सांस्कृतिक विभाग १९८९-९०

आपल्या महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षात भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या विभागामार्फत घडवून आणलेला या शैक्षणिक वर्षातील १२-९-८९ रोजीचा पहिला कार्यक्रम म्हणजे वर्ग प्रतिनिधींचा सत्कार. शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रपाठक मा. प्रा. एम. डी. नलावडे यांच्या हस्ते वर्ग प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले यांनी या कार्यक्रमात मार्गदर्शनपर भाषण केले. अध्यक्षस्थानी

आय. टी. आय. चे प्राचार्य मा. दळवी होते. याच वेळी मा. प्रा. डॉ. एम. डी. नलावडे यांनी 'नेताजी सुभाष चंद्र बोस' या विषयावर तब्बल अडीच तास व्याख्यान दिले.

दिनांक २२-९-८९ इ. रोजी 'आजचा तरुण व स्वामी विवेकानंद' या विषयावर प्रा. र. ज. भालेराव यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.

दिनांक ७-१०-८९ या दिवशी आमच्याच महाविद्यालयाचे प्राध्यापक एन. डी. खिचडी यांनी "जगण्यासाठी हसा, हसण्यासाठी जगा" या विषयावर व्याख्यान दिले.

दि. १९-१२-८९ इ. रोजी आमच्याच महाविद्यालयाचे व्यासंगी प्राध्यापक वी. बी. देशमुख यांनी "साहित्यातील सौंदर्य" या विषयावर भाषण केले.

दिनांक २२-१-९० या दिवशी सकाळी ११-०० वाजता प्रा. एम. के. गोंधळी यांचा बहारदार असा कथाकथनाचा कार्यक्रम झाला. "गुरुजी चालले मुंबईला" ही कथा त्यांनी सांगितली व २०-३-९० रोजी अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम पार पाडला.

**प्रा. पी. डी. सावंत**
सांस्कृतिक विभाग प्रमुख

## स्पर्धा, परीक्षा व मार्गदर्शन विभाग

महाविद्यालयातुन पदवी संपादन करून बाहेर बाहेर पडल्यानंतर विद्यार्थी-विद्यार्थीनीना विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाता यावे म्हणून महाविद्यालयात गेल्या वर्षापासून 'स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन विभाग' सुरू करणेत आलेला आहे. विविध स्पर्धा परीक्षांविषयी मूलभूत माहिती करून देणे हा या विभागाच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे ज्या विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात त्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मुख्यत्वेकरून मार्गदर्शन दिले जाते.

विभागाच्या वतीने प्रथम सत्रात दि. २६-९-८९ रोजी लेखी व वस्तुनिष्ठ बहुपर्यायी 'सामान्य अध्ययन परीक्षा' घेणेत आली. या परीक्षेचे स्वरूप व पद्धती लोकसेवा आयोगाच्या परीक्षेप्रमाणेच होती. सदर परीक्षेस १६९ विद्यार्थी बसलेले होते. दुसऱ्या सत्रात दिनांक २२-१२-८९ रोजी 'तोंडी परीक्षा' ( Oral Quiz Contest ) घेणेत आली. मुलाखतीचे स्वरूप विद्यार्थी-विद्यार्थीनीना समजावे एवढाच या मागील उद्देश या दोन्ही परीक्षेतील पहिल्या तीन क्रमांकाना प्रशस्तिपत्रे देण्यात आली.

या दोन परीक्षांशिवाय दुसऱ्या सत्रात विभागामार्फत प्रत्येक दोन मार्गदर्शक व्याख्यानांचे प्रत्येक आठवड्यातून एक दिवस आयोजन करणेत आले.

या विविध उपक्रमासाठी मा. प्राचार्य या विभागातील सहकारी प्राध्यापक व इतर प्राध्यापकांचे वेळोवेळी सहकार्य मिळाले.

**प्रा. एन. आर सावंत**
विभाग प्रमुख

## स्नेहसंमेलन १९८९-९०

या शैक्षणिक वर्षातील २८ व २९ डिसेंबर ८९ हे दोन दिवस म्हणजे महाविद्यालयातील आनंद पर्वणीच होती. स्नेहसंमेलने प्रतिवर्षी होतातच. पण काही चेहरे नवेही असतात. त्यामुळे या कार्यक्रमाचे नाविण्य हे असतेच. स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम दि. २८ व २९ डिसेंबर १९८९ रोजी पार पडले. मात्र त्यासाठी नियोजनाची सुरूवात प्रथम सत्राच्या शेवटच्या आठवड्यात झाली. परीक्षा व इतर अडचणींचा विचार करून स्नेहसंमेलन लवकर पार पाडले.



Scanned with CamScanner

क्रीडा, करमणूक, मनोरंजन, हळदीकंकू, हुंडाबंदी, चित्रप्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, अल्पोपहार, खेलापागोटे, फॅन्सी ड्रेस, फनी गेम्स इ. कार्यक्रमाबरोबर प्रश्नमंजूषा व कवीसंमेलन हे कार्यक्रम झाले.

हुंडाबंदी प्रदर्शन व रांगोळी प्रदर्शन या कार्यक्रमांचे उदघाटन गडहिंग्लजमधील उत्कृष्ट कला शिक्षक श्री. बी. जी. कुंभार यांनी केले. मुख्य कार्यक्रमामध्ये सुप्रसिद्ध मराठी कवी विंदा करंदीकर सुश्राव्य काव्य-वाचन सर्वांना ऐकावयास मिळाले. दुसरे अतिथी सिनेकलावंत मा. राजशेखर यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थीनीना पारितोषिके दिली गेली. आपले मनोगत मा. राजशेखर यानी मोजक्याच शब्दात रसिकांसमोर व्यक्त केले. सदर कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष, सचिव व संस्थेचे इतर पदाधिकारीही उपस्थित होते.

या सर्व कार्यक्रमांच्या आयोजन नियोजनामध्ये मा. प्राचार्य, इतर प्राध्यापक वर्ग, यु. आर., एल. आर., वर्ग प्रतिनिधी व प्रशासकीय कर्मचारी यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

**प्रा. एम. पी. पाटील**
स्नेहसंमेलन प्रमुख

## राष्ट्रीय सेवा योजना

आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेत १०० विद्यार्थी-विद्यार्थीनीना १९८९-९० या वर्षासाठी प्रवेश दिला. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत 'औरनाळ' ता. गडहिंग्लज हे खेडे दत्तक म्हणून निवडले. नियमीत कार्यक्रमामध्ये ५००० निलगीरी रोपे एन. एस्. एस्. विद्यार्थ्यांनी लावली. तसेच विविध राष्ट्रीय दिन साजरे केले. युवक सप्ताह साजरा केला. औरनाळ इथे निलगीरी संवर्धन, रस्ता दुरुस्ती ही कामे श्रमदानाने केली. या दत्तक खेड्यात विशेष श्रम संस्कार शिबीर ( दहा दिवसाचे ) आयोजित करण्यात आले. त्यामध्ये 'जनसाक्षरता' हा प्रमुख प्रकल्प होता. या योजनेत ५२ प्रौढ सहभागी झाले. त्यांना एन. एस. एस. संघटकांनी शिबीर कालावधीत शिकवीले. शिबीरानंतर प्रौढांना शिकवीण्याची जबाबदारी औरनाळ येथील युवकांनी स्वीकारली. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे, तसेच रस्ता दुरुस्ती, गट चर्चा, बौद्धिक व्याख्याने, मातीपरीक्षण आरोग्य तपासणी इ. कार्यक्रम करण्यात आले. एन. एस. एस. विद्यार्थीनींनी विविध गुणदर्शन कार्यक्रमाद्वारे लोकशिक्षणाचे कार्य केले. या सर्व कार्यक्रमात एन एस. एस. समिती सदस्य प्रा. शेळी, प्रा, डॉ. नेर्ले, प्रा. देसाई, प्रा. घाटारे, प्रा. कणसे, प्रा सावंत, प्रा. सौ. कणसे, प्रा. सौ. कोले, प्रा. कु. भोसले यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

एस. एस. एस. कार्यक्रम नियोजन व अंमल-बजावणी प्राचार्य डॉ. डी. व्ही तोगले यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच ऑफीस स्टाफनेही सहकार्य केले.

**प्रा. डी. आर. खटके**
प्रोग्रॅम ऑफीसर
एन. एस. एस.

## एन. सी. सी.

आमच्या महाविद्यालयातील एन. सी. सी. युनिट मध्ये सन १९८९-९० सालाकरीता एकूण ५२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. या कॅडेटसूना उत्कृष्ट ट्रेनिंग देण्यात आले व त्याच्या व्यक्तिमत्वाचा दर्जा वाढविण्यात आला. पूर्ण वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांमध्ये भरपूर उत्साह दिसून आला. एन. सी. सी. ट्रेनिंग व्यतिरिक्त वृक्षारोपण, रक्तदान, प्रौढशिक्षण व हुंडाबंदी सारखे उपक्रम राबविण्यात आले. आजच्या पर्यंतचा ट्रेनीग यशस्वीरित्या पार पाडण्यात आला. या वर्षी वारणानगर येथें झालेल्या वार्षिक ट्रेनिंग कॅम्पमध्ये एकूण ३५ विद्यार्थ्यांनी भाग घेऊन बॉयनेट फायटिंग मध्ये प्रथम क्रमांकाचे शिल्ड मिळविले. तसेच कॉर्टर गार्डमध्ये विशेष प्राविण्य मिळविले. कॅडेट



Scanned with CamScanner

घापा आहेत– रामायण ग्रंथाने भारताचे उत्तर आणि दक्षिण असे दोन तुकडे पाडले आहेत ही धमशास्त्रे, जुने लोक मेले म्हणजे बरे होईल.

ही सर्व निर्भीड, प्रक्षोभक विधाने आहेत. वरील ज्ञानसत्रातील विद्वानांच्या लेखी व तोंडी चर्चेवेळीही.

हे आंतरराज्य चर्चासत्र शिवराज महाविद्यालयामार्फत राजश्रीशाहू महाराज सभागृहात ता. १२ १३, व १४ मार्च १९९० रोजी पार पडले. शिवाजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि विद्यापीठ अनुदान मंडळ नवी दिल्ली यांच्या उत्साहाने व व मदतीने संपन्न झालेल्या या चर्चा सत्राचा मुख्य विषय होता.

○ धर्म, रुढी. परंपरा आणि भारतीय स्त्री

या मुख्य विषयाचे सुमारे २५ उपविभाग करुन ते निरनिराळ्या ठिकाणच्या संशोधक विद्वानांकडे सोपविण्यात आले होते. अर्थभेदक विषय, सडेतोड विवेचन, साधार चिकित्सा आणि चोखंदळ चर्चा यामुळे हे तीन दिवस सर्वांना एका वेगळ्याच ज्ञानानंदाच्या अपूर्व अनुभवात गेले. सुसंस्कृत आधुनिक जीवनाला धर्माची आवश्यकता काय आहे? "या खळबळजनक विषयावरच्या मुक्तचिंतनाने भलतीच धमाल उडवून दिली. तर दुसऱ्या रात्री प्रा. श्याम मानव भानामती, अंगात येणे, मुठ मारणे, दैवी चमत्कार इ. संबंधाच्या रसग्राही बुद्धीवादी प्रयोगाने सर्वानाच उत्साही बनविले.

तीन दिवस सकाळ, संध्याकाळ, दुपार आणि रात्रीसुद्धा ज्ञानप्रबोधनाचा नितांत सुंदर यज्ञयाग चालू होता. यासाठी पाच राज्यातून सुमारे ३५ विद्वान ता. ११–३–९० पासूनच जमा झाले होते. ता. १२ रोजी सकाळी मा. नगराध्यक्ष भिमराव नेवडे यांच्या अध्यक्षतेखाली मा. डॉ. देवदत्त दाभोळकर ( माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संघटनाचे अध्यक्ष इत्यादी) यांच्या शुभहस्ते या उपक्रमाचे उद्‌घाटन झाले प्रमुख पाहुण्या म्हणून 'मिळून साऱ्याजणी'' या कविताच्या संपादिका व स्त्री मुक्ती आंदोलनाच्या ख्यातनाम नेत्या विद्या बाळ या उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ डी. व्ही. तोगले यानी सर्वांचे हार्दिक स्वागत केले. ता. १४ रोजी समारोप झाला. प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय किर्तीचे जगद गुरु हिज होळीनेस' शिवयोगी चंद्रशेखर महास्वामीजी हे विराजमान होते. या ज्ञानसंत्राचे प्रवंतक व संयोजक प्रा. विठ्ठल बन्ने यानी सर्वाचे आभार मानले.

या ज्ञानसंत्रात राष्ट्रीय किर्तीचे पुढील विचारवंताचे निबंध वाद व वादविवाद झाले.

डॉ. के. सदाशिवम्–मदुराई, डॉ. एम. सुंदरम्–मद्रास, डॉ. देवदत्त दाभोळकर–पुणे, डॉ. तारा भवाळकर–सांगली, डॉ. आर. एन्. अरळीकट्टी–तिरुपती, डॉ. विठ्ठल बन्ने-गडहिंग्लज,डॉ. अनुराधा गुरव-कोल्हापूर डॉ. गणेश थिटे–पुणे, प्रा. जी. लक्ष्मैया नायडू, अनंतपुरम, प्रा. एम एम्. आपटे–पुणे, प्रा. सुरेश वाळिंबे गोवा, सौ. पुष्पा पाटील-कोल्हापूर, डॉ. अच्युत मानेनिपाणी, प्रा. प्रभा महाले-धारवाड, डॉ. अ. ह. साळुंखे सातारा, कु. एस्. पद्मा-क्विलॉन प्रा. श्याम मानव नागपूर, प्रा. सदाशिव आठवले-पुणे, डॉ. पी. जगदीशम मद्रास, प्रा. नवनाथ शिंदे-आजरा, श्रीमती विद्या बाळ पुणे, आर. विवेकानंद गोपाळ–तंजावर, डॉ. के. व्ही. इप्पन-केरळ, श्री. प्रमोद पाटील-मुंबई, इ. विद्वान संशोधकांच्या चर्चेत अनेक स्थानिक शिक्षक, प्राध्यापक, युवक आणि नागरिक सहभागी झाले होते.

या सर्व विवेचनाचे लेखी टिपण, चर्चा व वादविवादांचे टेपरेकॉर्डिंग, छायाचित्रे घेण्यात आली असून या अपूर्व बौद्धिक प्रबोधनावर एक अभिनव ग्रंथ प्रसिद्ध करावा, असा विचार चालू आहे.

अत्यंत जिव्हाळ्याचा विषय, चौफेर अभ्यास दूरदूरच्या विद्वानांची उपस्थिती, कार्यक्रम व वेळापत्रक यातील प्रयुक्त नियोजन, प्रगल्भ सामाजिक दृष्टीकोन आणि संयोजकाची आपुलकी यासारख्या



Scanned with CamScanner

अपरुप गुणांनी आम्ही खूपच पभावीत झालो अशी आपली पतिक्रिया बाहेरुन आलेल्या विद्वान पाहुण्यानी जाहिरपणे व्यक्त केली ही या ज्ञान सत्राची तुमच्या आमच्या दृष्टीने अभिमान वाटणारी गौरवशाली फलश्रुती होय.

**प्रा. विठ्ठल बन्ने**
ज्ञानसत्र प्रमुख

## राष्ट्रीय स्तरावरील पहिला हिंदी परिसंवाद

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठ अनुदान मंडळाने मान्यता दिलेला महाविद्यालयाच्या आयुष्यातील पहिला परिसंवाद आयोजित करण्याचा मान महाविद्यालयाच्या हिंदी विभागास मिळाला 'हिंदी तर प्रांतातील महाविद्यालय । विद्यापीठांतून हिंदी शिक्षणात येणाऱ्या अडचणी' या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादात भारतभरातून ६० लोक सहभागी झाले होते. १९, २०, २१ मे १९९० या काळात संपन्न झालेल्या या परिसंवादात एकूण ८ सत्रे झाली आणि महाविद्यालयीन विद्यापीठीय शिक्षणात येणाऱ्या विविध अडचणींवर चर्चा झाली. या निमित्त शोध निबंधांची एक पुस्तिकाही प्रकाशित करण्यात आली. महाराष्ट्र हिंदी अकादमीच्या अनुदानामुळे हे करणे शक्य झाले.

संस्थेचे अध्यक्ष खा. बाळासाहेब माने यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. के. बी. पवार यांच्या हस्ते या परिसंवादाचे उद्घाटन झाले आणि 'चौथा संसार' या दैनिकाचे संपादक मा. डॉ प्रभाकर माचवे यांच्या हस्ते समारोप झाला.

हिंदी शिकविण्यात येणाऱ्या अडचणींच्या विविध कारणांचा व अंशांचा गंभीरपणे विचार होऊन त्यातून कोणते मार्ग काढले पाहिजेत यांची चर्चा अत्यंत उपयुक्त ठरली. या परिसंवादाचे सर्वात मोठे फलित म्हणजे महाराष्ट्रातील हिंदी प्राध्यापकांची 'महाराष्ट्र हिंदी परिषद' ही संस्था सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**डॉ. सुधाकर गोकाककर**
संचालक


# ओम गणेश स्टील फर्निचर

कडगांव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
(फोन २१८ Gad. Exch.)

आमचेकडे सर्व प्रकारचे लोखंडी फर्निचर, ऑफीस व डायनिंग टेबल, खुर्च्या, कपाटे व इतर लोखंडी साहीत्याचे एकमेव उत्पादन

✦ वैशिष्टये – माफक दर
गेट टू गेज फर्निचर
तुमची पसंती आमची निर्मीती.



एक वेळ आवश्य भेट देऊन खात्री करा.

प्रोप्रा. ए. एम. पाटील (कडगांव)

# GADHINGLAJ TALUKA

# SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD. GADHINGLAJ-

TALUKA : GADHINGLAJ, DIST. : KOLHAPUR

( Maharashtra State )

## SALIENT FEATURES

1. Manufacture of White Crystal Sugar

2. Maximum price to the cane growers.

3. Recipient of Commendation Certificate from National Federation of Co-operative Sugar Factories Ltd., New Delhi for efficient Technical Performance shown contineously for for three years.

4. Established Ultra Modern Distillery First of its kind in India of contineous Fermentation Process based on 'VOGEL BUSCH' Multicont Technology of Austriya with incineration treatment ensuring ZERO POLLUTION.

5. Ambitious 'Cane Development Programme' for the benefit of cane growers.

6. Aim of alround Development of Gadhinglaj Taluka.

Vice Chairman
Ad. HANAMANTRAO PATIL

Chairman
Dr. S. S. SHAHAPURKAR

Managing Director
N. H. KALKE

BOARD OF DIRECTORS

Scanned with CamScanner

## हार्दिक शुभेच्छा

**मे. कोंडूसकर ट्रेडर्स, महागांव**

तांबा, पितळ, स्टिल, व अल्युमिनियमची भांडी योग्य दरात मिळण्याचे एकमेव दुकान

प्रोप्रा.– ग. रा. कोंडूसकर

---

**शीतल हॉटेल**

मेन रोड गडहिंग्लज प्रोप्रा.–श्री. मनोहर माने

---

**एरांस कोल्डिक हाऊस**

एस. टी. स्टँड समोर गडहिंग्लज प्रोप्रा.– राजेश पाटील

---

**ममता सायकल कंपनी**

एस. टी. स्टँड समोर गडहिंग्लज सायकल स्पेअरपार्टस विक्रेते प्रोप्रा.– झाकीर म. नदाफ

---

**मेघन मेडिकल्स**

एस. टी. स्टँड जवळ महागांव प्रोप्रा.– नरेंद्र हरळीकर

---

**महालक्ष्मी क्लॉथ मर्चंट**

बाजारपेठ, महागांव प्रोप्रा.– राजाराम परशराम कोपार्डे

---

**राधिका कोल्ड्रींक हाऊस**

आजरा रोड, गडहिंग्लज प्रोप्रा.– सर्जेराव दत्तात्रय देसाई

---

**ब्रह्मनाथ ट्रेडिंग कार्पोरेशन**

एस. टी. स्टँड जवळ आजरा रोड गडहिंग्लज

---

**लुकवेल ब्युटी पार्लर**

जुनें एस. टी स्टँड गाळा गडहिंग्लज फॅशनची दुनिया! फॅशनचे माहेर घर!! प्रोप्रा. गीतांजली शिंदे

---

**शिंदे ब्रदर्स वॉशिंग कंपनी**

राणी लक्ष्मीबाई रोड, गडहिंग्लज ड्राय क्लिनिंग स्पेशालिस्ट प्रोप्रा.– मधु व मोहन शिंदे

---

**महाराष्ट्र एस. टी कँटीन, गडहिंग्लज**

प्रोप्रा.– प्रल्हाद इंगळे


Scanned with CamScanner

# शिवराज कॉलेजला हार्दिक शुभेच्छा


**गीता वॉच कंपनी**

विक्री आणि दुरुस्ती आवश्यक भेटा. प्रोप्रा.-दिनकर कोले

**सागर वॉच कंपनी**

बँक ऑफ इंडिया शेजारी, गडहिंग्लज प्रोप्रा. डी. बी. बामणे

**चित्रगंगा फिल्मस्**

हावळ बिल्डीग मागे नवीन वसाहत, गडहिंग्लज, प्रोप्रा.- युवराज दळवी

**महेन्द्र हायफाय इकोफोनिक साऊंड सिस्टीम**

मेन रोड, गडहिंग्लज. अवश्य भेट द्या. प्रोप्रा.-एस. बी. सूर्यवंशी

**मगदूम रेडिओज**

रेडिओ, टेपरेकॉर्डर, व्ही सी आर साठी अवश्य भेट द्या. मेन रोड, गडहिंग्लज

प्रोप्रा.-बी. व्ही. मगदूम

**हिरा मेन्सवेअर**

राणी लक्ष्मीबाई रोड, गडहिंग्लज प्रोप्रा. हुंदळेकर ब्रदर्स

**प्रेरणा फोटो स्टुडीओ-महागांव**

फ्रेम मेकर महागांव आवश्यक भेटा. प्रोप्रो. चंद्रकांत सुतार

**श्री महालक्ष्मी स्वीटस्**

फरसाण व दुध सेन्टर नगरपालिकेसमोर, प्रोप्रा.-विजयराज सं. सोळंकी

**शिवराज कॅन्टीन आणि शिवराज साऊंड सिस्टीम**

शिवराज कॉलेज जवळ, गडहिंग्लज प्रोप्रा. सुरेश कोरवी


Scanned with CamScanner

# एन. सी. सी. चे छात्र





**अशोक डी. पकाले**
B. Com III
सिनिअर अंडर ऑफिसर कंपनी
कमांडरसाठी निवड (वारणानगर)



**वाय. एन. पाटील**
B. A. II
क्रॉस कंट्री तिसरा



**जी. आर. उतुरे**
B. Com. II
क्रॉस कंट्री दुसरा क्रमांक



**एस. ओ. निरहोळी**
XII Arts
सेकंड गार्ड कमांडर



**पी. ए. पाटील**
B. A. III
बायोनेट फायटींग प्रथम क्रमांक

Scanned with CamScanner

॥ सेवा परमो धर्म : ॥

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे

# शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डि. एस. कदम विज्ञान महाविद्यालय व संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय

गडहिंग्लज ( जिल्हा कोल्हापूर )

## असे आहे आमचे महाविद्यालय

- पुरोगामी विचारांचे क्रियादान पंडित कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रेरणा घेऊन त्यांच्या नांवे सुरु केलेली श्रेष्ठ संस्था
- राष्ट्रीय भावना, वैज्ञानिक दृष्टी, सामाजिक जाणीव आणि एकात्मतेची भावना ही चतुःसूत्री उराशी बाळगून गेली २६ वर्षे वाटचाल करणारे महाविद्यालय
- गडहिंग्लज, आजरा व चंदगड या तीन तालुक्यातील सर्व समाजाच्या एकात्म भावनेचे मनोज्ञ प्रतीक
- अकरावीपासून पी. एच्. डी. पर्यंतच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था बी. ए. ला विशेष स्तरावर इंग्रजी मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र हे विषय तर बी. कॉम. ला विशेष स्तरावर अकौन्टंसी, औद्योगिक व्यवस्थापन व सहकार हे विषय शिकविले जातात. बी. एस. सी. ला विशेष स्तरावर पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र तर एम. ए. साठी इंग्रजी (Entire)समाजशास्त्र (Entire) व मराठी-हिंदी शिकवले जातात. हिंदीमध्ये पी. एच्. डी. ची सोय उपलब्ध
- भव्य क्रीडांगण, उत्कृष्ठ ग्रंथालय, तज्ज्ञ, व्यासंगी व निष्णात प्राध्यापकवर्ग
- प्रशस्त इमारत, सुसज्ज प्रयोगशाळा, विविध शैक्षणिक उपक्रमांची रेलचेल
- एच्. एस्. सी. व विद्यापीठीय परिक्षेमध्ये उज्ज्वल निकालांची परंपरा श्रेष्ठ, क्रीडापरंपरा स्पर्धा परीक्षेसाठी स्वतंत्र मार्गदर्शन कक्ष, व्यक्तिमत्व विकासाबरोबर गुणवत्तावाढीवर विशेष भर त्यासाठी अत्यंत पोषक वातावरण उपलब्ध
- शिक्षण व नियमितपणा यावर भर १२ वी च्या हुशार विद्यार्थासाठी Scholar Batch व दर्जेदार मार्गदर्शनाची सोय.
- मुलांसाठी वसतीगृहाची सोय
- प्रारंभापासूनच क्रीडा, वक्तृत्व, नियतकालिक. राष्ट्रीय छात्रसेना ( N C C ) राष्ट्रीय सेवा योजन ( N S S ) या माध्यमातून प्रयोगशील राहिलेले एक गुणवत्ता महाविद्यालय
- संगणक ( Computer ) शिक्षणाची सोय

प्राचार्य
**डॉ. डी. व्ही. तोगले**
एम्. ए. पी. एच्. डी.

मा. खा. रा. शं. तथा
**बाळासो माने**
संस्थापक अध्यक्ष
क. वि. रा. शिंदे शिक्षण संस्था
गडहिंग्लज ( जि. कोल्हापूर )

Scanned with CamScanner